RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com | Vidabh Kesari News | 90969 45629 | @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैनिक **विदर्भ केसरी** विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

अमरावती

२४ मंगळवार फेब्रुवारी २०२६

✲ वर्ष ५ ✲ अंक २७०

✲ पृष्ठ : ६ ✲ मूल्य रु : ३

सुवर्ण संधी! सुवर्ण संधी!!

धमाका ऑफर

३ दिवस मोफत!

तुमच्या व्यवसायाला हवी आहे का मोठी प्रसिद्धी?
मग 'दैनिक विदर्भ केसरी' देत आहे तुम्हाला एक जबरदस्त प्लॅटफॉर्म!

१ दिवसाच्या जाहिरातीवर ३ दिवस मोफत!

कोणासाठी: दुकानदार, शैक्षणिक संस्था, शोरूम्स आणि सर्व व्यावसायिकांसाठी.
घाई करा! ही संधी सोडू नका.

अधिक माहितीसाठी संपर्क करा:
9975532291/9096945629

## अवकाळी पावसामुळे रब्बी पिकांचे मोठे नुकसान

**▸विदर्भ केसरी।**

पालम तालुका येथे सोमवारी (दि. २३) दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास झालेल्या अवकाळी पावसासह जोरदार वाऱ्यामुळे रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले. काढणीस आलेली ज्वारी, गहू व हरभरा ही पिके जमीनदोस्त झाली आहेत. गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण होते. सोमवारी अचानक आभाळ दाटून येत वारा सुटल्याने उभी पिके आडवी पडली. हरभऱ्याचे वाळलेले घाटे गळून पडले, तर गव्हाच्या ठुशीत पाणी शिरल्याने नुकसान वाढले. अनेक शेतकऱ्यांनी काढणी केलेल्या पिकांच्या खळ्यांनाही फटका बसला. आनंदवाडी, चाटोरी, बोरगाव, बंदरवाडी, खडी, नाव्हा, नाव्हलगाव व कांदलगाव या गावांमध्ये मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावल्याने शेतकरी हवालदिल झाले असून प्रशासनाने पंचनामे करून तातडीने मदत द्यावी, अशी मागणी होत आहे

## वीज पडून शेतकऱ्याचा मृत्यू

**▸विदर्भ केसरी। लातूर:**

जिल्ह्यातील निलंगा, रेणापूर, शिरूर अनंतपाळ तालुक्यांतील काही भागात सोमवारी दुपारी वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. तर लिंबाळा (ता. निलंगा) आणि रेणापूर तालुक्यातील काही गावांत गाराही पडल्या. या पावसामुळे रब्बी पिकांसह आंब्याचा मोहार गळून नुकसान झाले. काही गावांमध्ये पत्र्याच्या घरांचे नुकसान झाले आहे. वायगाव (ता. उदगीर) येथे शेतात काम करत असताना अंगावर वीज पडल्याने दिगंबर राम बेलकुंडे (वय ६०) यांचा मृत्यू झाला आहे. गेल्या दोन दिवसांपासून वातावरणात अचानक बदल झाला आहे. सोमवारी दुपारी ३:३० वाजण्याच्या सुमारास जोरदार वादळी वारे सुटले. लातूर जिल्ह्यातील निलंगा, रेणापूर, शिरुर अनंतपाळ, येरोळ, डिगोळ, अहमदपूर तालुक्यातील किनगाव, औसा तालुक्यातील खरोसा या भागात अवकाळी पाऊस झाला.



# पुन्हा अवकाळी

## मराठवाडा, विदर्भासह कोकणाला दणका

**▸विदर्भ केसरी।**



लातूरसह नांदेड, छ. संभाजीनगर, परभणी, बीड, धाराशिव, हिंगोली जिल्ह्यांतील ब-याच भागात रविवारी रात्री, सोमवारी पहाटे आणि दुपारच्या सुमारास झालेल्या अवकाळी पावसामुळे आंबा, द्राक्ष फळबागांसह रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले. वादळी वा-यासह पाऊस झाल्याने अनेक ठिकाणी ज्वारी, गहू, हरभरा, भाजीपाला आडवा झाला. त्यामुळे पिकांची हानी झाली आहे. यंदा अतिवृष्टीमुळे खरीप पिके हातातून गेली. त्यामुळे शेतक-यांना रबी पिकांची आशा होती. परंतु ऐनवेळी अवकाळी तडाखा बसल्याने शेतक-यांचे मोठे नुकसान झाले. दरम्यान, तातडीने पंचनामा करून शेतक-यांना मदत करावी, अशी मागणी होत आहे.

गेल्या २ दिवसांपासून हवामानात अचानक बदल झाल्याने लातूर जिल्ह्यासह बीड, नांदेड, धाराशिव, सोलापूर जिल्ह्यातील काही भागांत अवकाळी पावसाने हजेरी लावली. लातूरमध्ये लातूर तालुक्यासह रेणापूर, निलंगा, चाकूर तालुका व इतर ब-याच ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस बरसला. रेणापूर तालुक्यात सोमवारी सायंकाळी गारपीट झाली. वा-यामुळे घरावरील पत्रे उडाले. अवकाळी पावसाचा भाजीपाला, ज्वारी, गव्हासह रबी पिकांना मोठा फटका बसला. यासोबतच द्राक्ष, आंबा यासारख्या फळझाडांचेही नुकसान झाले.

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर, उमरगा तालुक्यात अवकाळी पावसाने तडाखा दिला. यासोबतच इतरत्रही ब-याच ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतपिकांची मोठी हानी झाली. नांदेड जिल्ह्यातही शहरासह जिल्ह्यात ब-याच भागात अवकाळीने दणका दिला. नांदेड शहरात सोमवारी पहाटे पावसाने हजेरी लावली. त्यानंतर दिवसभर ढगाळ वातावरण होते. दुपारी ४ च्या सुमारास जिल्ह्यात हिमायतनगर, माहूर, लोहा, कंधार, किनवट, हदगावसह अन्य भागांत वादळी वा-यासह पाऊस झाला. यामुळे कापणीला आलेला गहू, ज्वारी, हरभरा, करडईसह रबी पिकांचे नुकसान झाले. तसेच केळी, द्राक्ष, आंब्याचीही हानी झाली. बीड जिल्ह्यातही अवकाळी पाऊस झाला असून, परळी तालुक्यातील मांडेखेल शिवारात ज्वारी पिकाचे नुकसान झाले. वादळी वा-यामुळे पिके आडवी पडली आहेत. इतर पिकांनाही मोठा फटका बसला आहे. मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांतही अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतक-यांचे मोठे नुकसान झाले. हिंगोली जिल्ह्यातही काही ठिकाणी पाऊस झाला. वसमत शहरासह अनेक ठिकाणी पाऊस झाल्याने काढणीला आलेल्या रबी पिकांचे नुकसान झाले. आंबा उत्पादक शेतकरीही धास्तावले आहेत. परभणी शहरासह गंगाखेड, पालम तालुक्यांतील काही भागांत सोमवारी दुपारी तीनच्या सुमारास वादळी वा-यासह अवकाळी पाऊस झाला. आनंदवाडी, चाटोरी, बोरगाव, बंदरवाडी, खडी, नाव्हा, नाव्हलगाव, कांदलगाव या गावांना मोठा फटका बसला. त्यामुळे काढणीला आलेल्या रब्बी पिकांना मोठा फटका बसला.

## पीके भुईसपाट...

■ यासोबतच विदर्भात नागपूर, भंडा-यासह वाशिम जिल्ह्यात अवकाळी पावसाने तडाखा दिला. वाशिम जिल्ह्यात गहू, कांदा बिजवाई आणि हरभरा ही पिके भुईसपाट झाली. त्यामुळे शेतकरी धास्तावला आहे. नागपुरात रविवारी रात्री झालेल्या अवकाळी पावसामुळे शेकडो पोती धान्य भिजले. तसेच पिकांचीही हानी झाली. भंडारा जिल्ह्यात सोमवारी पहाटे चारच्या दरम्यान अवकाळी पाऊस सुरू झाला. सध्या चना, वाटाणा आणि लाखोरी ही पिके काढणीच्या अवस्थेत आहेत. अशा वेळी अवकाळी पाऊस झाल्याने पिकांची हानी झाली आहे. यामुळे शेतक-यांना रबीतही आर्थिक फटका बसू शकतो. यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यात अवकाळी पावसाने झोडपले आहे

## वीज कोसळून दोन ठार

■ नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर तालुक्यात सोमवारी सायंकाळी वादळी वा-यासह अवकाळी पाऊस झाला. या पावसादरम्यान शेतात काम करणा-या विशाखा सचिन येलकेवाड (३०) यांचा आणि उदगीर तालुक्यातील वायगाव येथील दिगंबर राम बेळकुंदे या शेतक-याचा अंगावर वीज पडून मृत्यू झाला.

## कोकणातही फटका

■ सिंधुदुर्ग जिल्ह्यातही अवकाळीने हजेरी लावली. फोंडाघाटासह परिसरात अवकाळी पावसाने झोडपून काढले. अवकाळी पाऊस आणि ढगाळ वातावरणाचा फटका आंबा आणि काजू पिकांना बसण्याची शक्यता असल्याने बागायतदारांची चिंता वाढली आहे.

## १० राज्यांना अलर्ट

■ बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे देशातील १० राज्यांना पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला. फक्त पाऊसच नाही तर या राज्यांमध्ये वा-याचा वेग हा प्रतीसात ३० ते ४० किमी असा असण्याची शक्यता आहे.

## अवकाळीचा कहर

परळी : परळी आणि अंबाजोगाई तालुक्यात सोमवारी दुपारी झालेल्या



अवकाळी पावसाने आणि सुसाट वादळी वा-याने रब्बी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान केले आहे. काढणीला आलेली ज्वारी, गहू आणि हरभरा पिके शेतातच जमीनदोस्त झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. दरम्यान, या परिस्थितीची गंभीर दखल घेत आमदार धनंजय मुंडे यांनी प्रशासनाला तातडीने नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. सोमवारी दुपारपासून अचानक आलेल्या पावसाने आणि जोरदार वा-याने तालुक्यातील अनेक गावांना तडाखा दिला. लमान तांडा, दारावती तांडा, वसंतनगर, मलकापूर, वैजवाडी, मोहद्रा आणि केशवनगर या भागात पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. खरीप हंगाम वाया गेल्यानंतर शेतक-यांच्या आशा रब्बीवर होत्या, मात्र अवकाळीने या कष्टावर पाणी फिरवले आहे.

## वादळाचा तडाखा

■ पिंपळगाव गाढे शिवारातील कोंबडमारी परिसरात वा-याचा वेग इतका प्रचंड होता की, अवघ्या दोन मिनिटांत अनेक झाडे मुळासकट उखडून पडली. अनेक ठिकाणी वीज खांबही जमीनदोस्त झाल्याने वीजपुरवठा खंडित झाला आहे. सुदैवाने या नैसर्गिक आपत्तीत जीवितहानी झाली नसली तरी आर्थिक नुकसान मोठे आहे.

## धनंजय मुंडे यांचे प्रशासनाला आदेश

■ नुकसानीची व्याप्ती पाहता माजी कृषी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी बीड जिल्हाधिका-यांना तातडीने अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. परळी व अंबाजोगाई परिसरातील बाधीत शेतक-यांना शासनाकडून लवकरात लवकर आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रशासनाने गतीने काम करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. ग्रामपंचायत सदस्य प्रवीण पवार यांनीही जिल्हाधिका-यांनी वैयक्तिक लक्ष घालून दिलासा द्यावा अशी विनंती केली आहे.

## गारपिटीने पिकांचे मोठे नुकसान

■ रेणापूर : प्रतिनिधी

■ रेणापूर शहरासह संपूर्ण तालुक्यात सोमवारी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास अचानक मेघगर्जना , वादळी वा-यासह झालेल्या गारपिटीमुळे शेतक-यांचे मोठे नुकसान झाले. काढणीस आलेला हरभरा, गहू, ज्वारी या पिकांसह आंबा , भाजीपाल्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. रेणापूर शहरासह तालुक्यात उन्हाची तीव्रता जाणवत होती तसेच ढगाळ वातावरणामुळे उकाडा ही दुपारपर्यंत जाणवत होता मात्र दुपारी ३ .३० ते ४ वाजाण्याच्या सुमारास अचानक जोरदार वा-यासह पावसाला सुरुवात झाली.

## एअर ॲम्ब्यूलन्सच्या अपघातात ७ जण ठार

**▸विदर्भ केसरी।नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



झारखंडची राजधानी रांची येथील बिरसा मुंडा विमानतळावरून दिल्लीकडे निघालेल्या खासगी चार्टर एअर अँब्युलन्सचा भीषण अपघात झाला. या विमानात चालक दलातील दोन सदस्यांसह एकूण ७ जणांचा मृत्यू झाला. हे विमान झारखंडमधील चतरा जिल्ह्यातील कसरिया पंचायत परिसरात कोसळले.

या अपघातानंतर एअरक्राफ्ट एक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरोची टीम घटनास्थळी पोहोचली. २३ फेब्रुवारी रोजी रेडबर्ड एअरवेज प्रायव्हेट लिमिटेडचे बीचक्राफ्ट सी-९० विमान रांची-दिल्ली मार्गावर एअर अँब्युलन्स उड्डाण करत होते. विमानाने सायंकाळी ७.११ वाजता रांचीहून उड्डाण केले. कोलकाता एटीसीशी संपर्क प्रस्थापित केल्यानंतर सायंकाळी ७.३४ वाजता दक्षिण-पूर्व वाराणसी परिसरात रडार आणि रेडिओ संपर्क तुटला. त्यानंतर विमानाशी कोणताही संपर्क होऊ शकला नाही. जिल्हा प्रशासनाची टीम घटनास्थळी पोहोचली असून एएआयबीकडून सखोल चौकशी सुरू करण्यात येणार आहे. सिमरिया पोलिस ठाण्याच्या हद्दीतील खासियातू करमटांड जंगलात हे विमान कोसळले असून, या भागात विमानाचे तुकडे आढळून आले आहेत. मलब्यात प्रोपेलर आणि इंजिनचे भाग दिसून आले आहेत.

## अजितदादा नावाचा जादूगार संबंध महाराष्ट्राला हसवत हसवत गेला

**▸विदर्भ केसरी।**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली. अधिवेशनाच्या आधी राजकीय वातावरण चांगलेच तापलेले आहे. अजित पवार यांच्या अपघातानंतरचे हे पहिलेच अधिवेशन आहे. तर सुनेत्रा पवार यांच्या उपमुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळातील पहिलेच अधिवेशन असणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयोजित केलेल्या चहापान कार्यक्रमावर महाविकास आघाडीने बहिष्कार टाकला होता. त्यामुळे हे अधिवेशन चांगलेच वादळी ठरण्याची शक्यता आहे.

अजित पवार नशिबाने नव्हे तर आपल्या कर्तृत्वाने मोठे झाले. ते आपल्यात नाहीत यावर कुणाचाही विश्वास बसत नाही. आज राजकारणात जे पोटात ते ओठात या पठडीतले फार कमी नेते आहेत. अजित पवार त्यापैकी एक नेते होते, अशी भावना भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत बोलताना व्यक्त केली.

मला फाईल नको निकाल दाखवा असे म्हणणारे अजित दादा होते. त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या विकासाची हानी झाली, असेही ते यावेळी बोलताना म्हणाले.

### रोहित पवारांना विधानसभेत अश्रू अनावर

**अजित पवारांच्या शोक प्रस्तावावर बोलताना आमदार रोहित पवार यांना आज अश्रू अनावर झाले. अजितदादा पवार नावाचा जादूगार सबंध महाराष्ट्राला हसवत हसवत गेला. दादांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणातील मिश्कीलपणा गेला. माझ्या शर्टचे वरचे बटण नेहमी उघडे असते. ते पाहून अजितदादा मला ते लावण्याचा सल्ला देत होते. आता 40-50 वर्षांनंतर कधी दादांची वर भेट झाली, तर मी हे माझे बटण त्यांच्यापुढे लावेन. तोपर्यंत हे बटण असेच खुले असेल. यामुळे त्यांची रोज आठवण येईल, असे ते म्हणाले.**

**सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी आज विधानपरिषदेतील अजित पवारांच्या शोक प्रस्तावावर आपली भावना व्यक्त केली. यावेळी त्यांनी आपल्या आमदार होण्याचा प्रवास उलगडून सांगत अजित पवारांच्या आठवणींना उजाळा दिला. अजित पवारांनी माझे शेणाने भरलेले हात पेणाला लावले, असे सांगताना मिटकरींना चांगलेच गहिवरून आले होते**

## 50 टक्के आरक्षण ओलांडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका लांबणीवर

**▸विदर्भ केसरी।**

**महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. त्यानुसार राज्यातील 50 टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने मनाई केली आहे. राज्यात आता 22 जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित राहणार आहेत. सर्वोच्च न्यायालयात पार पडलेल्या सुनावणीत अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणूक घेण्यास परवानगी देण्याची मागणी राज्य सरकारकडून करण्यात अली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास मनाई केली आहे. राहुल रमेश वाघ विरुद्ध केंद्र आणि महाराष्ट्र सरकार या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने बांठिया समितीपूर्वीच्या स्थितीनुसार निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. मात्र राज्य निवडणूक आयोगाने आरक्षणाची 50 टक्क्यांची कायदेशीर मर्यादा ओलांडल्याने 22 जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुकांना स्थगिती देण्यात आली आहे. सद्यस्थितीत 12 जिल्हा परिषदा आणि 125 पंचायत समित्यांच्या निवडणुका पार पडल्या असल्या, तरी आरक्षणाच्या या तांत्रिक पेचामुळे उर्वरित 22 जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका आता अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. राज्यातील ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 50 टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेली आहे, त्या ठिकाणच्या निवडणुकांवरील स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवली आहे. राज्य सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी 'अंतिम आदेशाच्या अधीन राहून' या निवडणुका घेण्याची परवानगी मागितली होती. मात्र, तांत्रिक गुंतागुंत पाहता सर्वोच्च न्यायालयाने अशी कोणतीही परवानगी देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. या न्यायालयीन भूमिकेमुळे राज्यातील प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.** जोपर्यंत आरक्षणाच्या मर्यादेबाबत कायदेशीर स्पष्टता येत नाही, तोपर्यंत निवडणूक प्रक्रिया पुढे नेण्यास न्यायालयाने हिरवा कंदील दाखवलेला नाही. परिणामी, अनेक जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे भवितव्य सध्या अधांतरी आहे.

## दारूड्या वडिलांची गळा आवळून हत्या

**▸विदर्भ केसरी। चिमूर,**

दारूचे व्यसन असणाऱ्या वडिलांच्या शिवीगाळ व मारहाणीच्या त्रासाला कंटाळून लहान मुलाने नायलॉन दोरीने गळा आवळून त्यांची हत्या केली. ही खळबळजनक घटना रविवारी रात्रीच्या सुमारास भिसी येथे घडली.

वडिलाने स्वतः आत्महत्या केली असल्याचा बनाव मुलाने पोलिसांसमोर केला होता. मात्र पोलिस खाक्या दाखविताच त्याने गुन्हा कबूल केला. संदेश मच्छिन्द्र मेश्राम (19) असे आरोपी मुलाचे, तर मच्छिन्द्र आनंद मेश्राम (51) असे मृतक वडिलाचे नाव आहे. तालुक्यातील भिसी येथील जुनी वस्ती परिसरात राहणाऱ्या मच्छिन्द्र मेश्राम यांना दारूचे व्यसन होते. त्यांना दोन मुले आहे. मच्छिन्द्र हे नेहमी दारू पिऊन पत्नी व मुलाला शिवीगाळ व मारहाण करीत होते. घटनेच्या दिवशी त्यांचा मोठा मुलगा पंचशील मेश्राम व पत्नी बाहेरगावी होते. त्यामुळे लहान मुलगा संदेश व वडील मच्छिन्द्र हे दोघेच घरी होते. गावात साक्षगंधाचा कार्यक्रम असल्याने संदेश हा तेथे जेवण वाढण्यासाठी गेला होता. जेवण आटोपल्यावर संदेश घरी परतला. त्यावेळी वडील घरी आले नव्हते. रात्री 11 वाजता ते दारूच्या नशेत घरी आले. त्यावेळी संदेश याने मी जेवण आणले आहे करून घ्या, असे वडिलांना म्हटले. मात्र मला अजून दारू प्यायची आहे, मी पुन्हा घेऊन येतो असे म्हटल्यावर मुलाने त्यांना बाहेर जाण्यास मनाई केली. परंतु, वडील ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्यांनी मुलाला शिवीगाळ करणे सुरु केले. त्यामुळे संदेशचा राग अनावर झाल्याने त्याने घरातील नायलॉन दोरीने गळा आवळून वडिलांना ठार केले.

दैनिक **विदर्भ केसरी** विदर्भाचा मानबिंदू

मंगळवार, २४ फेब्रुवारी २०२६ | २

# जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह बरसला अवकाळी

## शेकडो हेक्टरवरील रब्बी पिकांना फटका

**▸विदर्भ केसरी। चंद्रपूर,**



हवामान विभागाने सोमवारी वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तवला होता. तो अंदाज खरा ठरला. सोमवारी दुपारच्या सुमारास जिल्ह्यातील काही भागात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस बरसला.

या पावसाचा रब्बी हंगामातील पिकांना फटका बसला आहे. जिल्ह्यातील चंद्रपूर महानगरासह घुग्घूस, पोंभूर्णा, सावली, मूल, ब्रम्हपुरी, चिमूर, राजुरा, वरोडा व सिंदेवाही तालुक्यात सोमवारी अवकाळी पावसाने हजेरी लावली. राजुरा येथे सायंकाळी शाळा, कार्यालय सुटायच्या वेळेवर एक तास मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. शेतात कापूस वेचणी सुरू असल्याने शेतमजुर व शेतकरी हैराण झाले. या पावसामुळे शेतकऱ्यांचे गहू, मिरची, चना, मुंग, भाजीपाला आदी पिकांचे नुकसान होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी तूर पिक कापून शेतात ठेवले असल्याने हातातोंडासी आलेला घास हिरवण्याची शक्यता आहे.

चिमूर तालुक्यातील भिसी परिसराला दुपारच्या सुमारास वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने झोडपले. काही नागरिकांच्या घरामध्ये, तर काहींच्या दुकानांमध्ये पाणी शिरले. तर अनेकांच्या घराच्या छतावरील साहित्य उडाले. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे आंब्यांचा झाडावरील मोहर गळून पडला आहे. त्यामुळे आंबा उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच शेतकऱ्यांनी वाळविण्यासाठी खुल्या जागेवार ठेवलेली हळद ओली होऊन नुकसान झाले आहे.

वरोडा तालुक्यात सकाळपासून ढगाळ पसरले होते. सकाळी 8 वाजताच्या सुमारास काही भागात पावसाच्या सरी कोसळल्या. त्यानंतर उन्ह-सावलीचा लपंडाव सुरू होता. अशातच दुपारी 3 वाजताच्या सुमारास जोरदार वारे वाहू लागले आणि काही वेळातच पावसाने हजेरी लावली. तालुक्यातील शेगाव परिसरात जवळपास अर्धा तास जोरदार, तर माढेळी, नागरी परिसरात तुरळक पाऊस पडला. या परिसरात अचानकपणे आलेल्या पावसाने शेतकऱ्यांची चिंता वाढवली आहे. शेतकऱ्यांच्या हाती आलेल्या गहू, हरभरा पिकांचे नुकसान झाले आहे. ज्यांच्या शेतातील कापसाचा वेचा झाला नाही अशा शेतकऱ्यांच्या कापसाचेही नुकसान झाले आहे. सद्या रब्बी हंगामातील गहू, हरभरा ही पिके निघण्याच्या मार्गावर आहेत. तर काही शेतकऱ्यांची या पिकांची कापणी सुरू आहे. मात्र, याच दरम्यान अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने पिकांचे नुकसान होत आहे. खरीप हंगामातसुद्धा परतीच्या पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले होते. आता रब्बी हंगामात अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतकरी पुन्हा एकदा संकटात सापडला आहे.

### ■ वातावरणात गारवा

रविवारी जिल्ह्याचे तापमान 35.2 अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. मात्र, हवामान खात्याच्या अंदाजाप्रमाणे सोमवारी अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला आहे.

# अग्रलेख

## 'सर्वोच्च' चपराक

लोकशाही शासन व्यवस्था म्हणजे लोकांनी लोकांसाठी चालविलेली व्यवस्था असते. ती समाजाच्या तळागाळातील, गोरगरीब वर्गाच्या कल्याणासाठी असते. शासनाने समाजातील वंचित, पीडित, दलित, शोषित आणि उपेक्षित वर्गाच्या सर्वांगीण उत्थानासाठी आवश्यक निर्णय घेतले पाहिजेत, उपाययोजना केली पाहिजे, याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. कल्याणकारी शासन व्यवस्थेची ती नैतिक आणि मूलभूत जबाबदारी म्हटली पाहिजे. एकात्म मानववादाचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या अन्त्योदयाची संकल्पनाही हीच आहे. अन्त्योदय म्हणजे समाजातील शेवटच्या माणसाचे कल्याण. समाजातील शेवटचा माणूस म्हणजे उभ्या केलेल्या वा असलेल्या रांगेतील संख्यात्मकदृष्ट्या शेवटचा नाही, तर जो अन्न, वस्त्र आणि निवारा या जीवनातील मूलभूत गरजांपासून वंचित आहे तो. मात्र, गेल्या काही वर्षांत कल्याणकारी योजना आणि रेवडी संस्कृती यांची सरमिसळ केली जात आहे, असे नाईलाजाने म्हणावेसे वाटते. खरं म्हणजे रेवडी संस्कृती आणि कल्याणकारी योजना यांत खूप फरक आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत यातील सीमारेषा पुसट होत चालली आहे. रेवडी संस्कृतीत समाजातील गोरगरीब वर्गाच्या असहायतेचा एकप्रकारे गैरफायदा घेतला जातो, त्यांचे शोषण केले जाते, तर कल्याणकारी योजनेत त्याला स्वाभिमानाने जगण्याची संधी दिली जाते. सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात दिलेला निर्णय सगळ्यांच्याच डोळ्यात अंजन घालणारा म्हणावा लागेल. मोफत योजनांसोबत आणखी एक प्रकार सध्या जोरात आहे, तो म्हणजे थेट बँक खात्यात कोणत्याही सबसिडीचे पैसे जमा करणे. या प्रकारात भ्रष्टाचार कमी होत असला, तरी या योजनेचा मोठ्या प्रमाणात गैरफायदाही घेतला जातो, यात संशय नाही. सर्वोच्च न्यायालयाचा ताजा निर्णय तामिळनाडूसंदर्भात असला, तरी देशातील सर्व राज्य सरकारांना तो लागू होणारा आहे. द्रमुक सरकारने निवडणुकीवर डोळा ठेवून राज्यातील जनतेला मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला; त्याला तेथील वीज मंडळाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. राज्यात सध्या दरमहा 100 युनिट वीज मोफत आहे. नवी योजना लागू झाली तर संपूर्ण वीज मोफत मिळेल, एक रुपयाही कोणाला द्यावा लागणार नाही. महत्त्वाचे म्हणजे याचा फायदा जसा गरीब वर्गाला मिळेल तसाच तो श्रीमंतांनाही मिळेल. हरकतीचा मुद्दा हाच आहे. ज्याला गरज आहे, त्याला देण्यात काही हरकत नाही, पण ज्याला गरज नाही, त्याला कोणत्याही मोफत योजनेचा लाभ देणे चुकीचे म्हणावे लागेल. मोफत गोष्टी देण्याच्या योजनांमुळे देशाच्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण होत आहे, या शब्दात सर्वोच्च न्यायालयाने सरकारला फटकारत अशा योजनांचा फेरविचार करण्याची सूचना केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय देशाच्या व्यापक हिताचा म्हटला पाहिजे. तामिळनाडूत येत्या काही महिन्यात विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्या पृष्ठभूमीवर वीज वितरण कंपनीच्या याचिकेची दखल घेताना सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. विपुल पंचोली यांच्या खंडपीठाचे हे निर्देश तामिळनाडू सरकारला दिले आहेत. त्यावर तामिळनाडू सरकार कोणती भूमिका घेते, याकडे आता सगळ्यांचे लक्ष राहणार आहे. निवडणुका असलेल्या राज्यात निवडणुका जिंकण्यासाठी मतांवर डोळा ठेवत लोकांना आकर्षित करणारे लोकप्रिय निर्णय घेण्याची प्रथा पडली आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. मोफत योजना म्हणजे एकप्रकारे मतदारांना दिलेली लाच म्हटली पाहिजे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर पैसे देऊन मत विकत घेण्याचा लोकशाहीविरोधी प्रकार म्हटला पाहिजे. त्यातूनच लाडकी बहीण, लाडका भाऊ, लाडका काका, लाडका मामा, लाडका भाचा, लाडका पुतण्या अशा लाडक्या मालिकांच्या योजनांची रांग लागली. पाच वर्षांच्या शासन काळात लोकाभिमुख निर्णय न घेतल्यामुळे तसेच निवडणुकीच्या प्रचारात जनतेला सांगण्यासारखे काही नसल्यामुळे सर्वपक्षीय राज्य सरकारांना अशा रेवडी योजनांचा अवलंब करावा लागतो, असे म्हणायला हरकत नाही. रेवडी योजनांचा राज्याच्या तसेच देशाच्याही अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होतो. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे यातून आपण समाजाला ऐतखाऊ करतो, याचे भान ठेवण्याची गरज न्यायालयाने प्रतिपादिली आहे. सगळ्यांना सगळंच मोफत मिळाल्यास लोक काम तरी का करतील; यातून आम्ही कोणती संस्कृती विकसित करत आहे, असा जो प्रश्न न्यायालयाने विचारला, तो अतिशय मार्मिक म्हणावा लागेल. मोफत धान्य, मोफत वीज आणि अन्य मोफत योजनांची देशात लाट आली आहे. याचा अर्थ सरकारने समाजातील तळागाळातील लोकांच्या कल्याणासाठी काही करू नये, असे नाही. सरकार मग ते कोणत्याही राजकीय पक्षाचे असो, त्याने समाजातील तळागाळातील लोकांच्या व्यापक कल्याणासाठी तात्पुरत्या स्वरूपाच्या उपाययोजना करण्याऐवजी स्थायी स्वरूपाच्या उपाययोजना करण्याची गरज आहे. मोफत योजनांचा भडीमार करण्याऐवजी त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर केले पाहिजे. आपल्या पायावर उभे केले पाहिजे, यासाठी त्यांना शिक्षणाची संधी तसेच व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध करून दिले पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्वांना रोजगार मिळेल, याची काळजी घेतली पाहिजे. रोजगार उपलब्ध करून दिले तर लाचारीचे जीणे जगण्याची आणि मोफत योजनांची भीक घेण्याची वेळ कोणावर येणार नाही. सर्वांना ताठ मानेने आणि स्वाभिमानाने जगता येईल. या योजनेच्या नावात 'मोफत' हा शब्द असला, तरी यासाठी सरकारला खर्च करावा लागतोच. ही राशी थोडीथोडकी नाही, तर काही हजार कोटींच्या घरात असते. सरकारला मिळणारा महसूल हा निश्चित आहे; त्यात एका मर्यादेपेक्षा जास्त वाढ होऊ शकत नाही. त्यामुळे विकास कामांवरच्या खर्चाला कात्री लावली जाते. विकास कामांवरचा खर्च कमी झाल्यामुळे त्याचा फटकाही समाजालाच बसत असतो.

## वानाडोंगरीची खुशी निघोटला PCT परीक्षेत गोल्ड मेडल



**▸विदर्भ केसरी। सतीश भालेराव नागपूर/हिंगणा:-**

वानाडोंगरी, महाजनवाडी प्रभाग क्रमांक 12 परिसरातील कु. खुशी राजूजी निघोट हिने Datta Meghe Institute of Higher Education and Research, सावंगी (मेघे) येथे शिक्षण घेत PCT परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावून गोल्ड मेडल प्राप्त केले आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे हिंगणा महाजनवाडीचे नाव उज्वल झाले आहे.

तिच्या या यशाबद्दल संपूर्ण परिसरातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. वानाडोंगरी नगरपरिषदेचे नगरसेवक नितीन (आबा) काळे, नगरसेविका सिंधुताई निघोट, नगरसेवक शुभम गोहाड तसेच सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील दाभेकर, अतुल बोबडे आणि पवन भक्ते, चितेश नागमोते यांनी पुष्पगुच्छ देऊन तिचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. खुशीच्या या यशाबद्दल तिच्या आईबाबांनी मनःपूर्वक अभिनंदन करून उज्वल भविष्यासाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या.

## सुरक्षा समितीची बैठक

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ येथे वसतिगृह सुरक्षा समितीची बैठक शनिवारी पार पडली. या बैठकीचे अध्यक्षस्थान शहर पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक जी. ई. काळूसे यांनी भूषविले. बैठकीच्या प्रारंभी संस्थेचे प्राचार्य ए. पी. मटाले यांनी अध्यक्षांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच उज्वला शिरभाते यांनी समिती स्थापन करण्यामागील उद्देश व गरज याबाबत सविस्तर माहिती दिली. या सभेस विद्यार्थी वसतिगृह कुलमंत्री पी. पी. पवार, विद्यार्थिनी वसतिगृह कुलमंत्री एस. एस. कांबळे, समिती सदस्य सी. के. काळे, ज्येष्ठ नागरिक जी. के. पत्रकार, पालक प्रतिनिधी एस. आर. खंगार व एस. एस. गोरे उपस्थित होते

## शेतात वीज पडून पाच जखमी

**▸विदर्भ केसरी। राळेगाव,**



तालुक्यातील झरगड येथे सोमवार, २३ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ च्या सुमारास वीज पडून पाच जण जखमी झाले. त्यांना यवतमाळच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत. राळेगाव तालुक्यातील झरगड येथे शेतात वीज पडली. यात पाच जण जखमी झाले आहेत. यापैकी तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेत रामचंद्र नारायण पचारे (४५), गणेश नान्हे (५०), पदिले (५५), सुनीता राऊत (३५), वंदना पदिले (४२, सर्व राहणार झरगड) हे जखमी झाले आहेत.

सोमवारी दुपारी तीनच्या सुमारास अचानक Heavy rain मुसळधार पावसाला सुरुवात झाली. तेवढ्यात झरगड येथील रामचंद्र पचारे यांच्या शेतामध्ये हे मजूर काम करत होते. यानंतर पावसाला सुरुवात होताच ते एका झाडाखाली बसले होते. यावेळी अचानक मुसळधार पावसासह कडाडली आणि ती वीज अंगावर पडून पाच जण जखमी झाले. याची माहिती आजूबाजूच्या शेतकऱ्यांना कळताच तातडीने त्यांनी नातेवाईकांना बोलावून राळेगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र यामध्ये दोन पुरुष आणि एका महिलेची स्थिती गंभीर असल्याने त्यांना यवतमाळ शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची माहिती समजताच प्रशासनाकडूनही आवश्यक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

## क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत यवतमाळ जिल्हा अव्वल

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



: यंदाच्या तीन दिवसीय अमरावती विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल यवतमाळ येथे उत्साहात पार पडल्या. या दोन्ही स्पर्धेत विभागातील पाचही जिल्ह्यांमधून यवतमाळ जिल्ह्याने अव्वल स्थान गाठत पहिल्या क्रमांकाचे बक्षिस पटकावले. तर सर्वसाधारण क्रीडा स्पर्धेत अमरावती जिल्ह्याने व सांस्कृतिक स्पर्धेत अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयाने द्वितीय क्रमांकाचे बक्षिस मिळवले. या बक्षिसांचे वितरण विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांच्या हस्ते करण्यात आले.

या बक्षिस वितरण सोहळ्याला जिल्हाधिकारी विकास मीना, विभागीय अपर आयुक्त संजय जाधव, विरेंद्र हजारे, अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, महसूल कर्माचारी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष दिलीप कोलेवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

"अमरावती विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा उत्साहात व आनंदी वातावरणात झाल्याचा आनंद आहे. या स्पर्धांमध्ये अधिकारी- कर्मचारी ज्या उत्साह व आनंदाने सहभागी झाले, तोच उत्साह व आनंदी वातावरण नेहमी कायम ठेवावे आणि खिलाडूवृत्तीने नियमित कामकाज करावे. तसेच या स्पर्धेत जे सहभागी झाले नाही त्यांनाही प्रोत्साहित करावे. जीवनात नेहमी आनंदी राहून उत्साहाने आपले कामकाज करावे", असे आवाहन विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी यावेळी केले.

"ही स्पर्धा कौटुंबिक वातावरणात झाली. या स्पर्धेत खेळाडूंनी दाखवलेली शिस्त, वचनबद्धता, समर्पण भावना अविस्मरणीय असून त्यांचा उत्साह कौतुकास्पद आहे. हीच भावना आणि उत्साहाची प्रशासनाच्या नियमित कामकाजात अंमलबजावणी करावी. मैदानावर जिंकण्यासाठी शिस्त, टिम वर्क आणि नेतृत्व गुण महत्त्वाचे असतात ते नियमित प्रशासनात आण्यासाठी लक्ष्य केंद्रीत करावे. तसेच जनतेच्या कामांसाठी हे गुण आत्मसात करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले. या स्पर्धेत विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्यातील चमू सहभागी झाले होते. क्रीडा स्पर्धेत विभागीय आयुक्त कार्यालयास ५९, अकोला ८५, अमरावती २०१, यवतमाळ २८५, बुलढाणा ७८ आणि वाशिम १०९ अशी अंतिम गुणतालिका जाहीर करण्यात आली. तसेच सांस्कृतिक स्पर्धेत विभागीय आयुक्त कार्यालयास २४४.५ व यवतमाळ जिल्ह्यास २६४.५ गुण मिळाले. या बक्षिस वितरण सोहळ्यात विविध सांघिक व एकल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमधील विजेता, उपविजेत्यांचा पारितोषिक देवून सन्मान करण्यात आला. यात कबड्डी, क्रिकेट, वॉलीबॉल, फुटबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस, खो-खो आदी क्रीडा स्पर्धा व नृत्य, अभिनय, गीतगायन, नाटक आदी सांस्कृतिक स्पर्धेतील विजेत्यांचा समावेश होता. या सोहळ्याचे प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी केले. तहसिलदार योगेश देशमुख यांनी आभार प्रदर्शन केले.या बक्षिस वितरण सोहळ्याच्या अंतिम टप्प्यात राष्ट्रगीताने महसूल महोत्सवाचा समारोप करण्यात आला.

## जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धेचा जल्लोष रंगणार

**▸विदर्भ केसरी। नागपूर (प्रतिनिधी - राजहंस शेंडे):**




मानव विकास सेवा बहुउद्देशीय संस्था, मांगली (जि. नागपूर) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले असून क्रीडाप्रेमींसाठी हा एक उत्साहवर्धक सोहळा ठरणार आहे. ही स्पर्धा २८ फेब्रुवारी २०२६ रोजी, शनिवारी विजय विद्यालय, चांपा (ता. उमरेड, जि. नागपूर) येथे पार पडणार आहे. महिला, ट्रान्स महिला व युवतींसाठी खुल्या असलेल्या या स्पर्धेमुळे ग्रामीण भागातील महिलांना आपल्या क्रीडागुणांना वाव देण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. समाजातील "मुलींनी कशाला खेळायचं?", "कबड्डी हा महिलांचा खेळ नाही" अशा कालबाह्य समजुतींना छेद देत महिलांच्या सक्षमीकरणाचा ठोस संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे. स्पर्धेसाठी नोंदणी शुल्क २०० रुपये ठेवण्यात आले असून विजेत्या संघांसाठी आकर्षक पारितोषिकांची तरतूद करण्यात आली आहे. प्रथम क्रमांकासाठी ७,००० रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ५,००० रुपये तर तृतीय क्रमांकासाठी ३,००० रुपये बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. या स्पर्धेत जिल्हाभरातील अधिकाधिक महिला संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी रवींद्र कुरुडकर (मो. ८२०८३९७७४६) व सौ. ललिताताई कुडमते (मो. ८६३७७४२२१२) यांच्याशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

## सोनाळ्यात भव्य ट्रॅक्टर-ट्रॉली रिव्हर्स स्पर्धा

### ▸▸| प्रथम बक्षीस ११ हजार रुपये, २५ व २६ फेब्रुवारीला रंगणार कौशल्याची चुरस

**▸विदर्भ केसरी। संग्रामपूर -**



सातपुडा पर्वतरांगांच्या पायथ्याशी वसलेल्या सोनाळा (ता. संग्रामपूर, जि.बुलढाणा) येथे प्रथमच भव्य ट्रॅक्टर-ट्रॉली रिव्हर्स स्पर्धेचे आयोजन २५ व २६ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे. सचिन बापू लेआउट येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत ही दोन दिवसीय स्पर्धा पार पडणार आहे. ट्रॅक्टर चालकांना आपले कौशल्य दाखविण्याची सुवर्णसंधी या निमित्ताने उपलब्ध होणार आहे.

गावोगावी वाढलेले यांत्रिकीकरण, ट्रॅक्टरची वाढती संख्या आणि अरुंद रस्ते यामुळे ट्रॉलीसह वाहन मागे घेताना अपघात होण्याची शक्यता लक्षात घेऊन चालकांचे कौशल्य विकसित व्हावे, या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. शेतकरी बांधव व ट्रॅक्टर चालकांच्या सुप्त गुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या निमित्ताने होत आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क ३०० रुपये निश्चित करण्यात आले असून सहभागी चालकाचे वय किमान २१ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. वैध वाहन परवाना व आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. पंचकमिटीचा निर्णय अंतिम मानण्यात येईल. स्पर्धेसाठी आकर्षक रोख पारितोषिकांची घोषणा करण्यात आली आहे. प्रथम क्रमांकासाठी ११ हजार रुपयांचे पारितोषिक साई ट्रॅक्टर (जळगाव जामोद) यांच्या वतीने देण्यात येणार आहे. द्वितीय क्रमांकासाठी ७१०० रुपये अनघा मोटर्स (संग्रामपूर) यांच्याकडून तर तृतीय क्रमांकासाठी ६१०० रुपये महिंद्रा महालक्ष्मी (मलकापूर) यांच्या वतीने प्रदान करण्यात येतील. तसेच चतुर्थ क्रमांकासाठी ५१०० रुपये आणि पाचव्या क्रमांकासाठी ३१०० रुपयांचे पारितोषिक आयोजकांनी जाहीर केले आहे. स्पर्धेचे आयोजन समस्त गावकरी मंडळी, सोनाळा यांच्या वतीने करण्यात आले आहे. पंचकमिटीमध्ये प्रदीपभाऊ भुतडा, हर्षल खंडेलवाल, राजेश विश्वकर्मा, डॉ.अमोल कुकडे, रमेश खोकले, अजय अग्रवाल, सचिन अग्रवाल, वैभव राहणे, स्वप्नील देशमुख, दाभाडे गुरुजी, प्रविण ढोरे, कुलदीप दाभाडे, अमोल घोडेस्वार, शेख मुस्ताक, मोहन ठोकणे, प्रविण शर्मा, अमोल मोदे व सुभाष डोमाळे यांचा समावेश आहे. स्पर्धेदरम्यान घड्याळवाले म्हणून सुशील माळोकर काम पाहणार असून समालोचनाची धुरा निलेश तायडे सांभाळणार आहेत. अधिक माहितीसाठी आनंद आप्पा खांडे (मो.८०५५२९८५९०), शंकरनाथ विश्वकर्मा (मो.९५५२२५२३७४), प्रकाश गोतमारे (मो.९०११३१३३१०), संदीपभाऊ खांदेशे (मो.९९२१८४६४००) व सुनील लव्हाळे (मो.९०२२७९४९५९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सोनाळा येथे प्रथमच होत असलेल्या या स्पर्धेमुळे चालक व नागरिकांमध्ये उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले असून २५ व २६ फेब्रुवारी रोजी सोनाळ्यात कौशल्य, अचूकता आणि नियंत्रणाची खरी कसोटी लागणार आहे. जास्तीत जास्त ट्रॅक्टर चालकांनी सहभागी होऊन आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करावे तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l,

Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## दांडक्याने केली जबर मारहाण

■ पांढरकवडा : तालुक्यातील जिरा येथे झाडझाड केल्याने घरात धूळ येते या कारणावरून आरोपींनी लाकडी दांडक्याने मारहाण करून जखमी केले. ही घटना २० फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता घडली. सकू समचंद्र जाधव याच्या तक्रारीवरून अरविंद शेषराव राठोड यांच्या विरोधात पांढरकवडा पोलिसांनी कलम ११८ (१), ३५२, ३५१ (२) (३) भारतीय न्याय संहितेनुसार मारहाणीचा गुन्हा दाखल केला.

# कामगारांनी तात्काळ कामावर रुजू व्हावे

## जिल्हा प्रशासनाचे आवाहन : कामगार व कंपनीची परिस्थिती विचारात घेवून समन्वयाने तोडगा काढावा

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**



येथील रेमण्ड युको डेनिम कंपनीतील कामगारांची आर्थिक परिस्थिती तसेच कंपनीची परिस्थिती विचारात घेवून समन्वयाने तोडगा काढावा. औद्योगिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कामगारांनी कुठल्याही बेकारदेशीर कृत्याचा अवलंब न करता १६ फेब्रुवारी २०२६ रोजी पासून पुकारलेला बेकायदेशीर संप मागे घेवून कामावर तात्काळ रुजू व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

रेमण्ड युको डेनिम प्रा.लि., एमआयडीसी लोहारा, यवतमाळ या कंपनीतील कामगारांनी दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी पासून बेकायदेशिररित्या संप पुकारल्याचे निदर्शनास येत आहे. यवतमाळ जिल्ह्यातील औद्योगिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने व्यवस्थापन प्रतिनिधी व मान्यताप्राप्त संघटना प्रतिनिधी तसेच इतर संघटना व उपोषणास बसलेल्या कामगार प्रतिनिधींसोबत त्यांचे वेतन वाढीच्या मागण्याबाबत दिनांक २० फेब्रुवारी २०२६ रोजी व आज दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सदर संप व उपोषण मागे घेवून कंपनीचे कामकाज सुरळीत करण्यासाठी व्यवस्थापनानेही कामगारांच्या मागण्यांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी मा जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठका घेण्यात आल्या. आज दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या झालेल्या बैठकीमध्ये उपस्थित कामगारांचे व त्यावर व्यवस्थापनाचे म्हणणे ऐकूण घेवून मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, यवतमाळ जिल्ह्यामध्ये रेमण्ड ही एक मोठी कंपनी असून ही कंपनी बंद पडल्यास कामगारांचे रोजगारच जाणार नाही तर त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटूंबांचे काय होईल, याचा सर्व कामगारांनी विचार करावा. सर्व कामगारांनी त्वरीत रात्रीपाळीपासून कामावर रुजू व्हावे व काम सुरु करावे, व्यवस्थापनाशी चर्चा सुरुच ठेवून मागण्यांवर तोडगा काढावा. ज्या मागण्या वरिष्ठ व्यवस्थापनाशी संबंधित आहेत, त्याबाबत स्थानिक व्यवस्थापनाने वरिष्ठ व्यवस्थापनाशी चर्चा करुन पूढील निर्णय घ्यावा, असे आवाहन मा. जिल्हाधिकारी यांच्याव्दारे करण्यात आले.

> ■ सद्यस्थितीत कामगारांची आर्थिक परिस्थिती तसेच कंपनीची परिस्थिती विचारात घेवून समन्वयाने तोडगा काढावा. औद्योगिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राखावी. कुठल्याही बेकारदेशीर कृत्याचा अवलंब न करता दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी पासून पुकारलेला बेकायदेशीर संप मागे घेवून कामावर तात्काळ रुजू व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.
>
> ■ जे कामगार कामावर जाण्यास ईच्छूक असतील त्या कामगारांनी मागणी केल्यास पोलीस संरक्षण देण्यात येईल. बेकायदेशिररित्या कुणी कामावर जाणा-या कामगारांची अडवणूक करणार असेल तर त्यांच्या विरुध्द पोलीस प्रशासनामार्फत कारवाई करण्यात येईल, असे आवाहनही जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

## महत्त्वाचे



### कळंब तालुक्यातील धोत्रा येथे वाऱ्यासह गारपीट; शेतकऱ्यांचे नुकसान

**▸विदर्भ केसरी। कळंब तालुका प्रतिनिधी :=विरेंद्र चव्हाण**

कळंब :-कळंब तालुक्यातील धोत्रा येथे वाऱ्यासह गारपीट; शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटल्याच्या घटनाही घडल्या आहेत. याशिवाय शेतकऱ्यांचे गहू, हरभरा तसेच इतर रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. गारपीटीमुळे पिके आडवी पडल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने पाहणी करून अहवाल सादर करण्याची गरज व्यक्त होत आहे.

### कुही पंचायत समितीच्या महिला क्रिकेट संघाचा जिल्हास्तरीय स्पर्धेत उपविजेता मान

**▸विदर्भ केसरी। कुही प्रतिनिधी राजहंस शेंडे**



जिल्हास्तरीय खेळ, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात पंचायत समिती कुहीच्या महिला क्रिकेट संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपविजेतेपद पटकावले. संपूर्ण स्पर्धेत संघाने शिस्तबद्ध खेळ, संघभावना आणि जिद्दीच्या जोरावर अंतिम फेरीपर्यंत मजल मारत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली. या संघाचे नेतृत्व कर्णधार वैशाली अंजनकर यांनी समर्थपणे केले, तर उपकर्णधार प्रीती माकोळे यांनीही संघाला भक्कम साथ देत महत्त्वाची भूमिका बजावली. दोघींच्या नेतृत्वाखाली संघातील खेळाडूंनी सातत्यपूर्ण आणि दमदार खेळ सादर केला. या यशामागे पंचायत समिती कुहीचे गट विकास अधिकारी डॉ. स्वप्नील मेश्राम यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सहाय्यक गट विकास अधिकारी जगदीश बेंडे, अर्चना मेश्राम, शुभांगी धारगावे व मंगला निकोसे यांनी संघाच्या तयारीसाठी आणि व्यवस्थापनासाठी विशेष प्रयत्न केले.
संघाच्या या यशामुळे कुही तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, भविष्यातही अशाच उल्लेखनीय कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### धामणगाव (देव) येथे श्री मुंगसाजी महाराज पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम

**▸विदर्भ केसरी। दारव्हा (प्रतिनिधी) :**

विदर्भातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री भगवान मुंगसाजी महाराज (मुंगसाजी माऊली) यांची पुण्यतिथी आज दि. 24 रोजी , फाल्गुन शुद्ध सप्तमी रोजी धामणगाव (देव) (ता. दारव्हा, जि. यवतमाळ) येथे मोठ्या भक्तिभावात साजरी होणार असून या निमित्ताने धामणगावात विविध धार्मिक कार्यक्रमांसह भव्य जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यतिथीच्या पार्श्वभूमीवर माऊलींच्या रथाचे विधिवत पूजन, पायी दिंडी, भजन-कीर्तन, हरिपाठ तसेच महाप्रसाद आदी कार्यक्रम होणार आहेत. यासोबतच धामणगाव (देव) परिसरात मोठी जत्रा भरणार असून विविध दुकाने, खेळणी, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स व मनोरंजनाचे साहित्य भाविकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. मुंगसाजी महाराज पुण्यतिथी – आजचे विशेष : पुण्यतिथी दिवस : फाल्गुन शुद्ध सप्तमी दि. 24 फेब्रुवारी श्री मुंगसाजी महाराज संस्थान, मुख्य दरबार, धामणगाव (देव), ता. दारव्हा, जि. यवतमाळ इतिहास : सन १९५८ मध्ये फाल्गुन शुद्ध सप्तमीला महाराजांनी महानिर्वाण स्वीकारले रथपूजन, पायी दिंडी, भजन-कीर्तन, हरिपाठ, महाप्रसाद व भव्य जत्रा
धामणगाव (देव) हे मुंगसाजी महाराजांचे जन्मस्थान व तपश्चर्येचे पवित्र स्थान असून येथेच त्यांची समाधी व स्मृतिशिल्प आहे. आजच्या या पुण्यतिथी उत्सवासाठी विदर्भभरातून अनेक दिंड्या गावात पोहोचल्या असून भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित असून, या जत्रेमुळे संपूर्ण धामणगाव भक्तीमय आणि उत्सवमय वातावरणात न्हालेला दिसणार आहे.

## गाडगेबाबा जयंती उत्साहात साजरी

**▸विदर्भ केसरी।दर्यापूर :**



येथील साई पार्क परिसरातील श्री संत गाडगेबाबा सेवा समिती ट्रस्ट यांच्या वतीने राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर गाडगेबाबा यांच्या समाजप्रबोधन, स्वच्छता आणि अंधश्रद्धा निर्मूलन कार्याचा गौरव करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या विचारांचे स्मरण करून समाजात स्वच्छता, सेवा आणि मानवतेचा संदेश पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या मनोगतात गाडगेबाबा यांच्या कार्याचा आदर्श घेऊन समाजसेवा करण्याचे आवाहन केले. तसेच परिसर स्वच्छ ठेवणे, गरजूंना मदत करणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे हीच खरी गाडगेबाबांना अभिवादन असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, महिला, युवक तसेच समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन श्री संत गाडगेबाबा सेवा समिती ट्रस्ट, साई पार्क दर्यापूर यांनी केले.यावेळी सुधाकर भारसाकळे, ईश्वर बुंदेले दिलीप चव्हाण मनोज बोरेकर राजाभाऊ तराळे शिवाजी देशमुख संजय चव्हाण आतिश शिरभाते मंगल बुंदेले गजानन देशमुख अमोल कंटाळे निलेश शिंगणे गणेशराव माळोकार विठ्ठल गायागोले माधवराव देशमुख, धनुसेठ राजपुरोहीत सुभाष बुंदेले धनराज बुदेले शंतनू बौरेकर वर्षा बोरेकर स्नेहा देशमुख मंगला तराळे वर्षा ताई मंदा इंगळे सुचिता शिंगणे वंदना सोलंकी इंगळे ताई रेखा बुंदेले पुष्पाबाई बुंदेले समिक्षा बुंदेले सलोनी बुंदेले भावना बुंदेले लावव्या बुंदेले गायगोले ताई उपस्थित होते

## आमदार, नगराध्यक्षा व नगरसेवकांचा सत्कार

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



दि. १५/०२/२०२६ ला महाशिवरात्रीचे औचित्य साधून महारुद्र हनुमान मंदिर भाग १ येथे आमदार,नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवक यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले .सुरुवातीला श्रीराम प्रभूच्या प्रतिमेचे पूजन व चारिटेबल ट्रस्टच्या बॅनर चे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळासाहेब मांगुळकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळासाहेब मांगुळकर यांचा शॉल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार मधुकर ढोरे यांच्या हस्ते करण्यात आला तसेच यवतमाळ शहराच्या नगराध्यक्षा ॲ. प्रियदर्शनी अशोकराव उईके यांचा सत्कार पद्माताई गोरे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच उपाध्यक्ष व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दत्ताभाऊ कुळकर्णी यांचा सत्कार सचिन भाऊ गोरे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच प्रभाग क्र. 23 चे नगरसेवक प्रमोद भाऊ बगाडे यांचा सत्कार भाऊरावजी मोहदे यांच्या हस्ते करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ता गौरव कदम यांचे वडील दीपकराव कदम यांचा सत्कार दुर्गाप्रसाद शुक्ला यांच्या हस्ते करण्यात आला. संगीताताई बोबडे यांचा सत्कार मेघाताई फेंडर यांच्या हस्ते करण्यात आला .तसेच प्रभाग क्र.२५ च्या नगरसेविका सपनाताई लंगोटे यांचा सत्कार मिनाताई ढोरे यांच्या हस्ते व वैशालीताई उईके यांचा सत्कार सौ बुटले ताई यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे उपाध्यक्ष श्री रविंद्र पारीसे यांनी केले. प्रास्ताविकेमध्ये मंदिराच्या परिसरात उपलब्ध नसलेल्या सुविधांबाबत पाहुण्यांना माहिती करून देण्यात आली. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांनी उणिवांची पूर्तता करण्याचे आश्वासन दिले .कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता विजयसिंह ठाकूर, प्रदिपराव जुमनाके, दिलीप पकडे, विजय जुमनाके तसेच ट्रस्टचे सर्व सभासद व सल्लागार समितीच्या कार्यकारिणीने सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.अर्चना पडोळे ह्यांनी केले तर आभार प्रदर्शन महेंद्र फेंडर यांनी केले. कार्यक्रमानंतर फराळाचे आयोजन करण्यात आले होते. अशा प्रकारे कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

## कुही पंचायत समितीच्या महिला क्रिकेट संघाचा जिल्हास्तरीय स्पर्धेत उपविजेता मान

**▸विदर्भ केसरी। कुही (प्रतिनिधी - राजहंस शेंडे) :**



जिल्हास्तरीय खेळ, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात पंचायत समिती कुहीच्या महिला क्रिकेट संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपविजेतेपद पटकावले. संपूर्ण स्पर्धेत संघाने शिस्तबद्ध खेळ, संघभावना आणि जिद्दीच्या जोरावर अंतिम फेरीपर्यंत मजल मारत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली. या संघाचे नेतृत्व कर्णधार वैशाली अंजनकर यांनी समर्थपणे केले, तर उपकर्णधार प्रीती माकोळे यांनीही संघाला भक्कम साथ देत महत्त्वाची भूमिका बजावली. दोघींच्या नेतृत्वाखाली संघातील खेळाडूंनी सातत्यपूर्ण आणि दमदार खेळ सादर केला.

या यशामागे पंचायत समिती कुहीचे गट विकास अधिकारी डॉ. स्वप्नील मेश्राम यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सहाय्यक गट विकास अधिकारी जगदीश बेंडे, अर्चना मेश्राम, शुभांगी धारगावे व मंगला निकोसे यांनी संघाच्या तयारीसाठी आणि व्यवस्थापनासाठी विशेष प्रयत्न केले. संघाच्या या यशामुळे कुही तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, भविष्यातही अशाच उल्लेखनीय कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## निविदा प्रक्रियेत होणाऱ्या भ्रष्टाचार विरुद्ध पुसद काँग्रेस आक्रमक ; साखळी उपोषण सुरू

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**




सार्वजनिक बांधकाम विभाग पुसद अंतर्गत विकासकामा साठी निविदा प्रकाशित केल्या जात आहे स्थानिक आमदार तथा मंत्र्यांच्या आशीर्वादाने निविदा प्रक्रियेत आनागोंदी सुरु असून मर्जीतील कंत्राटदाराला काम देता येईल या साठी चार- चार,पाच- पाच महिने निविदा न उघडणे, कंत्राटदाराला निविदा सादर करण्यापासुन रोखणे, कंत्रातदाराणा धमक्यादेणे, निविदा सादर करणाऱ्या कंत्रात दारा कडून वारवार कागद पत्राची मागणी करणे आणि दुसरी कागद सादर करू नका अशा प्रकारचा दबाव आणणे हे सर्व प्रकार सार्वजनिक बांधकाम विभागात चालू आहे या मुळे मोठ्या प्रमानात भ्रष्टाचार वाढलेला आहे त्यामुळे कामाचा दर्जा राहिलेला नाही मागील वर्षभरात कंत्राटदाराकडून कामे झालेली आहेत हेअतिशय निकृष्ठ दर्जाची आहे हे उघड डोळ्याने दिसत आहे.

शासकीय विश्राम गृह पुसदच्या नवीन बांधकाम करिता सुमारे 6 महिन्या पूर्वी निविदा प्रकाशित झाली होती मात्र ती आज रोजी उघडण्यात आली नाही सदर निविदा उघडण्याबाबत दि.27 जानेवारी 2026 रोजी निवेदन देण्यात आले होते परंतु निविदा उघळणे बाबत 20 फेब्रुवारी 2026 पर्यन्त कार्यवाही झाली नाही. म्हणून पुसद तालुका व शहर काँग्रेस कमेटी तर्फे दि.23 फेब्रुवारी पासून साखळी उपोषण करणे बाबतचा निर्णय घेतला.उपोषण सुरु झाल्या मुळे निविदा उघडण्याची कामाला धावपळ करीत सुरु झालेली आहे मात्र निविदा उघडणे हा प्रश्न आज राहिला नाही तर निविदा उघळण्या करिता कुठलेही तांत्रिक कारण नसतांना चार पाच महिन्याचा कालावधी लावल्यागेला या दिरंगाई साठी जबाबदार असलेले कर्मचारी व अधिकाऱ्या वर त्वरित कार्यवाही व्हावी या साठी साखळी उपोषणाची सुरवात केली आहे संबंधितांनी या बाबत आवश्यक ती कार्यवाव्ही त्वरित करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल आणि होणाऱ्या परिणामास सबंधित अधिकारी जवाबदार राहील असा इशारा निवेदनाद्वारे काँग्रेस पक्षातर्फे देण्यात आला आहे.

# तेली प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत रिंगस क्रिकेट क्लब हे ठरला प्रथम विजेता

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**



पुसद :- "येथील मुस्लिम तेली समाजाच्या वतीने काकडदाती येथील डीजे टर्फवर क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. या आयोजित क्रिकेट सामन्याच्या प्रथम विजेत्याला ७७७७ रुपयांचं बक्षीस हनिफ निरबान यांचे वतीने देण्यात आले तर दुसऱ्या क्रमांकाचे ५५५५ रुपयांचे बक्षीस फिरोज तगाले यांच्या वतीने देण्यात आले. विजेत्यांची ट्रॉफी हाजी अजीस चव्हाण , तर दुसऱ्या क्रमांकाची ट्रॉफी निजाम जी गौरी यांच्या वतीने तर प्रत्येक मैचेस मध्ये मॅन-ऑफ-द-मैच ची ट्रॉफी रहेमान असलम चव्हाण यांच्या तर्फे देण्यात आली तर मॅन-ऑफ-द-सिरीज चे चार ही ट्रॉफी मुबारक निरबाण यांच्या वतीने देण्यात आली या तीन दिवसीय क्रिकेट सामन्यात ८ टीमचे सामने रंगले होते या मध्ये चुरशी ची लढत करून रिंगस क्रिकेट क्लब व निरबाण क्रिकेट क्लब हे दोन्ही टीम अंतिम सामन्यात पोहचले होते. त्यांच्या मध्ये चांगलीच लढत होऊन रिंगस क्रिकेट क्लब हे विजयी झाली तर निरबाण क्रिकेट क्लब दुसऱ्या क्रमांकाची विजेता ठरली. तर रिंगस टीम चे खेळाळू अनिस निरबाण यांना मॅन-ऑफ-द-मैच व बेस्ट प्लियर ऑफ द मैच यांना देण्यात आले व मॅन-ऑफ-द-बेस्ट फिल्डर शाहरुख निरबाण, मॅन-ऑफ-द-बेस्ट बॉलर मोहसिन निरबाण यांना देण्यात आला होता. रेफरी म्हणून ताज जिंदरान, फहिम मेमन यांनी कार्य केले. सूत्र संचालन लतीफ गौरी यांनी केले.

या प्रसंगी हनिफ निरबाण , फिरोज तगाले , हाजी हनिफ चव्हाण, मुबारक निरबाण, हाजी अजीस चव्हाण , युनूस निरबाण ,अनिस चव्हाण, मतीन चव्हाण, जुबेर चव्हाण, सलीम निरबाण, वसीम निरबाण, सरफराज निरबाण , व अन्य मान्यवरांच्या हस्ते खेळाडूना ट्रॉफी देण्यात आली. आयोजन अजहर निरबाण सर, जम्मा गौरी , विक्की गौरी, शकील गौरी, अब्दुल रहेमान चव्हाण, फारूक चव्हाण, लतीफ गौरी, रशीद मामा चव्हाण, सोहेल निरबाण , युसुफ निरबाण, रहेमान गौरी ,इद्रिस रजा, वसीम चव्हाण, सोनू तगाले, अनस चव्हाण , सलमान निरबाण , लकी निरबाण व अन्य क्रिकेटप्रेमी यांनी अथक परिश्रम घेतले.

## कुही तालुक्यात दिवसाढवळ्या उत्खनन, माफियांच्या विळख्यात

### महसूल यंत्रणेवर संगनमताचे आरोप, मंत्री बावनकुळे यांचे लक्ष वेधण्याची मागणी

**▸विदर्भ केसरी। राजहंस शेंडे**




कुही तालुक्यात अवैध उत्खननाने उघडपणे थैमान घातले असून महसूल विभागाची भूमिका अत्यंत संशयास्पद ठरत आहे. ग्रामस्थांकडून वारंवार तक्रारी, ठोस माहिती आणि प्रत्यक्ष दाखले देऊनही संबंधित अधिकारी कारवाई करण्यास टाळाटाळ करत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

तालुक्यात अनेक ठिकाणी दिवसाढवळ्या अवैध उत्खनन सुरू असून, याबाबत अधिकाऱ्यांना फोनद्वारे कळवले असता ते फोनही उचलत नसल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे. शेकडो ठिकाणी सुरू असलेल्या या प्रकाराकडे दुर्लक्ष करून केवळ एखाद्या ठिकाणी कारवाईचा दिखावा केला जात असल्याने महसूल विभागावर संगनमताचे आरोप अधिकच तीव्र झाले आहेत. "कारवाईपेक्षा दिखावा आणि जबाबदारीपेक्षा मौन" अशी भूमिका प्रशासनाने घेतल्याचे चित्र स्पष्ट दिसत असून उत्खनन माफियांना जणू खुलेआम मोकळे रान मिळाले आहे. पर्यावरणाचा ऱ्हास, शासनाचा महसूल बुडीत जाणे आणि स्थानिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असतानाही अधिकारी निष्क्रिय का, हा प्रश्न उपस्थित होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या गंभीर प्रकरणाकडे तातडीने लक्ष देणे अत्यंत आवश्यक ठरत आहे.

कुही तालुक्यातील परिस्थितीची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. आता मंत्रीस्तरावरून कठोर पावले उचलली गेली नाहीत, तर "प्रशासनच माफियांच्या आहारी गेले आहे" असा ठपका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## महत्त्वाचे




### राष्ट्रीय सेवा योजनेतून घडते सक्षम व्यक्तिमत्व - प्रा. अनिल नाचणे

**▸विदर्भ केसरी।**

व्यक्तिमत्व विकास म्हणजे व्यक्तीच्या विचारसरणी, वर्तन, सवयी, कौशल्ये आणि भावनिक संतुलन यांचा सर्वांगीण विकास होय. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही गुण जन्मतः असतात, तर काही गुण प्रयत्नांनी विकसित करता येतात. व्यक्तिमत्व विकासामुळे आत्मविश्वास वाढतो, निर्णयक्षमता सुधारते आणि जीवनात यश मिळवण्याचा मार्ग सुकर होतो. स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित, जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे आयोजित 'विशेष श्रम-संस्कार शिबिर' दिनांक १७ फेब्रुवारी ते २४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल के. बोडखे यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आले. दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी शिबिरामध्ये व्यक्तिमत्व विकास या विषयावर विद्यार्थ्यांसाठी विचार पुष्प गुंफण्यात आले. ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मा. श्री शेषरावजी काळे, आजीवन सभासद, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती हे होते त्यांनी आपल्या अध्यक्षयी भाषणातून विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकासामुळे तुम्ही भविष्याच्या संधी कशा निर्माण करू शकता यावर विस्तृत मार्गदर्शन केले, प्रमुख वक्ते मा. अनिल पुंडलिकराव नाचणे, प्राध्यापक , यशवंतराव चव्हाण कला महाविद्यालय मलकापूर दापूरा यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी सकारात्मक विचारसरणी अत्यंत महत्त्वाची आहे. नकारात्मक विचार मनावर परिणाम करतात, तर सकारात्मक दृष्टिकोन व्यक्तीला कठीण परिस्थितीतही पुढे जाण्याची प्रेरणा देतो. तसेच, चांगले संवादकौशल्य हे व्यक्तिमत्वाचा महत्त्वाचा भाग आहे. स्पष्ट, नम्र आणि प्रभावी संवादामुळे समाजात आदर मिळतो असे प्रतिपादित केले संपूर्ण शिबिराचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री राहुल सावरकर, सह कार्यक्रमा अधिकारी डॉ. सुशील चरपे तसेच महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रीती दिवाण व सहाय्यक महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. अपर्णा दिघडे यांच्या मार्गदर्शनात पार पडले.कार्यक्रमाचे संचालन कु. समीक्षा सावरकर हिने तर आभारप्रदर्शन कू. कल्याणी अनासाने हिने केले.

### अंबाई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अमरावती च्या वतीने शिवजयंती उत्सव उत्साहात



**▸विदर्भ केसरी।**

अंबाई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अमरावती च्या वतीने अखंड भारताचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्सव विविध सामाजिक उपक्रमातुन साजरा करण्यात आला, विद्यार्थी आपल्या देशाचे भविष्य असुन या विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम अंबाई च्या मार्फत घेतले जातात, यावर्षी लाडक्या राजांची जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले मराठी शाळा खडकारी पुरा महाजन पुरा,येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे चित्रात रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले,जीथे वर्ग पहीली ते चौथी च्या मुलांनी यात सहभाग घेतला, सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र,डाईंग बुक,कलर तसेच खाऊ देण्यात आला, विशेष तीन चित्रांना मेडल देण्यात आले,या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून, मुख्याध्यापिका योगिता नीतनवरे मॅडम, साहित्यिक श्रध्दा ताई कोल्हटकर, गायिका कलाकार अनिता ताई अडकीने , समाजसेवी मिनाक्षी ताई पाटील, नॅशनल मल्लखांब खेळाडू तेजस्विनी लोणकर, अनमोल चव्हाण,विशेष अतिथी म्हणून हर्षद जी केडिया,यांची उपस्थिती लाभली,या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी सावित्रीबाई फुले मराठी शाळा येथील शिक्षकवृंद प्रीती ठाकरे मॅडम,रूपाली क्षीरसागर मॅडम, विद्या गावंडे मॅडम विजयकर सर,तसेच ईतर सहकारी यांचे योगदान मिळाले या कार्यक्रमाचे आयोजन अंबाई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अमरावती च्या संस्थापक अध्यक्षा सौ माधुरी सचिन चव्हाण यांनी केले

# कानिफनाथ महाराजांच्या भव्य यात्रोत्सवाचे आयोजन.

**▸विदर्भ केसरी। मंगरूळनाथ:**



श्री क्षेत्र सावरगाव कान्होबा या नावाने तालुकाच नव्हे तर वाशीम आणि आजूबाजूच्या जिल्ह्याच्या नागरिकांच्या आस्थेचे प्रतीक असलेल्या व नवनाथांपैकी एक असलेल्या चैतन्य कानिफनाथ महाराजांचा भव्य यात्रा महोत्सव यावर्षी संस्थानाच्या वतीने विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून साजरे करण्यात येत आहे. कानिफनाथ महाराजांच्या यात्रेचे हे १५३ वे वर्ष आहे. येत्या २१ तारखेपासून तर पुढील महिन्याच्या ३ तारखेपर्यंत पर्यंत नवनाथ कथा (भागवत सप्ताह), अखंड हरिनाम, प्रवचन, भजन, कीर्तन,काकडा इत्यादी भरगच्च कार्यक्रमांची रेलचेल या दोन आठवड्या दरम्यान मंदिर परिसरात राहणार आहे. २१ फेब्रुवारी पासून २७ फेब्रुवारी पर्यंत नवनाथांच्या ४० अध्यायांचे वाचन प्रह्लाद महाराज जणूना (सोनवळ) यांच्या सुमधुर वाणीतून भक्तांसाठी होणार असून सप्ताहाची सांगता रात्री १२ वाजता होऊन याचवेळी काठीची प्रथम भेट होणार आहे. २८ फेब्रुवारीला प्रातःकाळी महापूजा व होम विधीचे आयोजन श्री योगीसिद्ध शांतिनाथ महाराज पंढरपूर व श्री धनराज भारती महाराज मुख्य पुजारी अनुसया माता मंदिर माहूर यांच्या संयुक्त हस्ते मंदिरात करण्यात आले आहे.

हभप रामेश्वर महाराज काजळंबा यांचे सकाळी नऊ वाजता काल्याचे किर्तन होणार आहे.

२८ फेब्रुवारीला रोजी सकाळी १० ते ५ वाजताच्या दरम्यान रांगेत बारीमध्ये ग्रामस्थ आणि भक्तगणांच्या उपस्थितीत महाप्रसादाचा वाटप करण्यात येणार आहे. सावरगांव येथे कानिफनाथ महाराजांचे गडावर पुरातन मंदिर असून, निसर्गरम्य ठिकाणी असलेल्या ह्या मंदिरावर दरवर्षी हजारो श्रध्दाळू मोठ्या श्रद्धेने दर्शनासाठी येत असतात. यावर्षी १५३ व्या यात्रा महोत्सवा निमित्य आयोजित धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचा व महाप्रसादाचा लाभ चैतन्य कान्होबाच्या भक्तांनी घेण्याचे आवाहन संस्थानचे विश्वस्त राजेंद्र पाटील राऊत यांनी ग्रामस्थांच्या वतीने केले आहे.



# पैनगंगा अभयारण्य परिसरात अवकाळी पावसाचा तडाखा

### ७५ टक्के पिकांचे नुकसान

**▸विदर्भ केसरी। कुरळीः प्रतिनिधीः मिलिंद चिकाटे**

पैनगंगा वन्यजीव अभयारण्य अंतर्गत येणाऱ्या जंगलभागात रविवारी रात्री अवकाळी पाऊस व जोरदार वादळी वाऱ्याने मोठा तडाखा दिला. घमापुर, कुरळी, नारळी, अमडापूर, टाकळी (बंदी), चिखली (वन), भवानी, वालतूर, कोरटा, दराटी (बंदी) आदी गावांमध्ये शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार गहू, हरभरा, ज्वारी, मका तसेच इतर हंगामी पिकांचे सुमारे ७५ टक्के नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. वादळामुळे अनेक ठिकाणी पिके आडवी पडली असून काही ठिकाणी काढणीस तयार असलेला गहू आणि हरभरा पूर्णपणे जमिनीवर कोसळला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे.

अचानक झालेल्या पावसामुळे शेतात पाणी साचले असून उभ्या पिकांची गुणवत्ता घसरली आहे. बंदी भागातील नागरिक व शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. शेती हाच मुख्य उत्पन्नाचा स्रोत असल्याने या नुकसानीमुळे कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर परिणाम होणार आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करावे आणि शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई जाहीर करावी, अशी जोरदार मागणी स्थानिकांकडून होत आहे. दरम्यान, कृषी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. फोटो ओळी पण आवरण्यात गावांमध्ये रविवारी झालेल्या अवकाळी पावसामुळे मका व गहू पिकाचे अशाप्रकारे मोठे नुकसान झाले आहे

# कर्मयोगी संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी

### माणुसकीची भिंत सोशल फॉउंडेशन पुसद व मिशन ग्रीन बहुउद्देशीय संस्थेचा पुढाकार

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**




माणुसकीची भिंत ही मागील दहा वर्षापासून कर्मयोगी संत गाडगेबाबा यांनी दिलेल्या दशसूत्री वर कार्य करीत आहे व मिशन ग्रीन हे पुसद परिसर हिरवेगार करण्याकरिता मागील पाच वर्षापासून झाडे लावून वाचवण्याचे कार्य करत आहे. कर्मयोगी, राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंती निमित्त, कर्मयोगी 'संत गाडगेबाबा स्मृती स्थळ, जाधव बाग पार्डी रोड निंबी येथे त्यांच्या मूर्तीचे पूजन उपस्थित मान्यवर पोहरादेवी संस्थांनचे विश्वस्थ प्रा.जगदीश राठोड ,गुरुदेव सेवा मंडळाचे प्रा.नंदकुमार खैरे,गुरुदेव सेवा मंडळाचे धर्माळे सर, मराठा सेवा संघांचे अध्यक्ष हरगोविंद कदम, सुमित नर्सरी वरुडचे सर्वे सर्वा प्रभाकरजी टेटर शेतकरीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकरी दत्तात्रय जाधव हस्ते करून त्यांना अभिवादन करण्यात आले. गुरुदेव सेवा मंडळाचे श्री धर्माळे सर व श्री नंदकिशोर खैरे यांनी कर्मयोगी संत गाडगेबाबा यांचे विचार अतिशय सोप्या पद्धतीने सर्वांसमोर मांडले.कर्मयोगी संत गाडगेबाबा यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सर्वांनी स्वच्छता व अंधश्रद्धा या विषयी लोकांना जागृत करावे असे मत त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. देव देवळात नसून तो दीनदुबळ्यात आहे असे गाडगेबाबा म्हणायचे.माणुसकीच हा खरा धर्म आहे असेही त्यांनी या प्रसंगी सांगितले. या कार्यक्रमा करिता माणुसकीच्या भिंतीचे अध्यक्ष गजानन जाधव यांनी एक मार्च रोजी रविवारी माणुसकीची भिंत पुसद, रुग्णमित्र फाउंडेशन व मिशन ग्रीन यांचे मार्फत कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या जयंती निमित्य संत गाडगे बाबा स्मृतीस्थळ पार्डी रोड निंबी येथे गरजवंताकरिता निशुल्क आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात येत असल्याचे जाहीर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिशन ग्रीनचे उपाध्यक्ष पवन बोजेवार यांनी केले तर आभार प्रदर्शन मिशन ग्रीनचे अध्यक्ष रमेश डंबोळे यांनी केले या कार्यक्रमकरिता प्रतापराव पतंगे, मधुकर चव्हाण,जगदीश सोनुने,जयसिंग राठोड,धनंजय कोठाळे,गणेश सावंत,अरुण नागुलकर,विलास जाधव,जय जाधव, प्रकाश येल्हेकर संतोष गावंडे ,संतोष आंबोरे नंजय आघाम,अनंता चतुर,पंजाब ढेकळे,अविनाश अंभोरे,दीपक मोरे आदित्य जाधव,प्रमोद ठाकूर,दादाराव पाईकराव पोलीस पाटील लिंबी रामराव पाटील मूर्तिकार मुरलीधर ढगे,दत्ता मस्के व निंबी व पार्डि येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पोहरादेवी भाजपा मंडळ बूथप्रमुखांची बैठक संपन्न.



**▸विदर्भ केसरी। मानोरा:--**

विश्रामगृहात आयोजित भारतीय जनता पक्षाचे पोहरादेवी मंडळ बुतस्तरीय बैठक विविध विषयावर सांगोपांग चर्चा होऊन संपन्न झाली. भारतीय जनता पक्ष प्रदेश कार्यालयातून आलेल्या शिष्टमंडळाकडून पोहरादेवी भाजपा मंडळ अंतर्गत येत असलेल्या सर्व बूथ प्रमुखांची बैठक पोहरादेवी मंडळ तालुका अध्यक्षाच्या नेतृत्वात आज सार्वजनिक बांधकाम विभागाच्या स्थानिक विश्रामगृहात आयोजित करण्यात आली होती ज्यामध्ये सर्व बूथप्रमुखांनी उपस्थिती लावली होती. भारतीय जनता पक्षाचे सध्या संघ आणि राज्यामध्ये सरकार असून लोकोपयोगी योजना समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे कार्य पक्षाच्या बुत प्रमुखांनी करण्याचे आवाहन प्रदेश कार्यालयातून आलेल्या टीमने बैठकीत हजर असलेल्या बूथप्रमुखांना केले. राज्यात नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्ष क्रमांक एकचा पक्ष ठरला असून भविष्यात आपल्या तालुक्यामध्ये होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुकीमध्ये पक्षाने पहिला क्रमांक मिळवण्यासाठी बूथप्रमुखांनी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची जबाबदारी सुद्धा आजच्या बैठकीत देण्यात आली.



पळस फुलला की धरतीला ज्वालांची किनार लाभते, कोरड्या रानालाही नवचैतन्याची चाहूल लागते।(छायाचित्रे:-स्वराज गुर्जर) शिरसगाव कसबा:-सातपुडा पर्वतावर पळस बहार फुलला(फोटो)

# कलिंगडचे भरघोस उत्पन्न : बळीराजाची उन्नती !

## शेतकऱ्याची यशोगाथा: सस्तीच्या शेतकऱ्यांनी ४एकरात घेतले कलिंगड चे भरघोस उत्पन्न !



**▸विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर**

बाळापूर : पातूर तालुक्यातील कृषी विभाग अंतर्गत येत असलेल्या सस्ती येथील प्रगतशील शेतकरी ज्ञानेश्वर मुरलीधर राऊत यांनी त्यांच्या ४ एक्कर शेतात ८००क्विंटल कलिंगड चे उत्पन्न घेऊन इतर शेतकऱ्यासाठी प्रेरणादायी ठरले आहेत.

शेतकरी ज्ञानेश्वर राऊत यांनी पारंपरिक पिकाला फाटा देत फळवर्गीय कलिंगड पिकाची योग्य तंत्रज्ञानाचा वापर करून आवश्यकतेनुसार योग्य मशागतीच्या जोरावर भरघोस उत्पन्न घेतले आहे. चार एकर शेतात कलिंगड या पिकाला आंतरमशागत पोटी जवळपास तीन लाखावर खर्च आला असून यामध्ये उत्पन्न आठ ते दहा लाखाच्या जवळपास झाले असल्याचे शेतकरी ज्ञानेश्वर राऊत यांनी सांगितले आहे. यामुळे परिसरात त्यांच्या मेहनतीची जोरदार चर्चा परिसरात सुरू आहे. शेतकरी ज्ञानेश्वर राऊत यांनी व्यापाराला माल विकला असून सस्ती येथील हा पूर्ण माल कलकत्ता येथील बाजारपेठेत विक्री केली असल्याचे त्यांनी सांगितले आहे. स मल्चिंगचा अवलंब करून योग्य पद्धतीने मशागत केल्याने उत्पादन झाले असल्याचे शेतकरी राऊत त्यांनी सांगितले आहे..

**■ मी मागील चार वर्षांपासून फळवर्गीय कलिंगड या पीकाची लागवड करीत आहे. या वर्षी चार एकर क्षेत्रफळात लागवड केलेली आहे सध्याच्या परिस्थितीत कलिंगड तोडणीस आले आहे खर्च अधिक आहे परंतु उत्पादन सुध्दा समाधान कारक मिळते.**
**-ज्ञानेश्वर राउत**
**कलिंगड उत्पादक शेतकरी**
**सस्ती ता पातूर**

# शिरपूर ग्रामीण रुग्णालयात माणुसकीला काळिमा

## डॉ. खरात व नर्स शारदा सोनटक्के यांच्यावर कारवाईची मागणी

### डॉ. खरात व नर्स शारदा सोनटक्के यांच्यावर कारवाईची मागणी

**▸विदर्भ केसरी। शिरपूर : (प्रतिनिधी)**

मालेगाव तालुक्यातील शिरपूर येथील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणाचा आणि अरेरावीचा अत्यंत संतापजनक प्रकार समोर आला आहे प्रसूतीसाठी आलेल्या एका महिलेच्या उपचारात दिरंगाई केल्यामुळे माता आणि नवजात बालकावर संकट ओढवले असून, या प्रकरणी डॉ. खरात आणि स्टाफ नर्स शारदा सोनटक्के यांच्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करावी, अशी आक्रमक मागणी पीडित कुटुंबाने केली आहे.

काय आहे नेमकी घटना

शिरपूर येथील विशाल गजानन गुंजकर यांनी तालुका आरोग्य अधिकारी, मालेगाव यांच्याकडे दिलेल्या लेखी तक्रारीनुसार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ११.३० वाजेच्या सुमारास त्यांच्या बहिणीला प्रसूती वेदना सुरू झाल्याने त्यांना तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, रुग्णालयात डॉ. खरात उपस्थित नव्हते. नातेवाईकांनी वारंवार विनंती केल्यानंतर प्रसूती करण्यात आली, मात्र त्यानंतर नवजात बालिकेची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले. नर्स शारदा सोनटक्के यांचे उद्धट वर्तन

तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, केवळ उपचारातच हलगर्जीपणा झाला नाही, तर रुग्णालय कर्मचाऱ्यांची वागणूकही अत्यंत क्लेशदायक होती. प्रसूतीसाठी आलेल्या रुग्णाची आई आणि इतर नातेवाईकांनी जेव्हा माहिती विचारण्याचा प्रयत्न केला, तेव्हा स्टाफ नर्स शारदा सोनटक्के यांनी त्यांना अत्यंत उद्धट भाषेत उत्तरे देऊन अपमानास्पद वागणूक दिली. "डॉक्टर नाहीयेत, जे होईल ते बघा" अशा स्वरूपाचे शब्द वापरून त्यांनी जबाबदारी झटकल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. संकटाच्या काळात आधार देण्याऐवजी नर्सने केलेल्या या अरेरावीमुळे नातेवाईकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे. वेळेत उपचार न मिळाल्याने बाळाची प्रकृती खालावली

बाळाची प्रकृती गंभीर असल्याचे लक्षात येऊनही तिला पुढील उपचारासाठी 'रेफर' करण्याच्या प्रक्रियेत डॉ. खरात आणि नर्स सोनटक्के यांनी जाणीवपूर्वक विलंब केला. वेळेत योग्य वैद्यकीय मदत न मिळाल्याने नवजात बालिकेची तब्येत अधिकच बिघडली. अखेर नाईलाजाने कुटुंबाला त्या मातेला आणि बाळाला खासगी वाहनाने वाशिम येथे हलवावे लागले. सी सी टीव्ही फुटेज तपासून कारवाई ची मागणी

"रुग्णालयातील सीसीटीव्ही फुटेज तपासल्यास डॉ. खरात यांची अनुपस्थिती आणि नर्स शारदा सोनटक्के यांचे नातेवाईकांशी केलेले उद्धट वर्तन स्पष्टपणे दिसून येईल," असे विशाल गुंजकर यांनी निवेदनात म्हटले आहे. या दोषींवर तात्काळ निलंबनाची कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

आरोग्य व्यवस्थेचे वाभाडे

या घटनेनंतर काही दिवसांतच पुन्हा असाच प्रकार याच रुग्णालयात घडल्याची चर्चा आहे. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे शिरपूर ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या कार्यशैलीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वरिष्ठ अधिकारी या प्रकरणाची सखोल चौकशी करून पीडित कुटुंबाला न्याय देणार का? असा प्रश्न शिरपूरमध्ये चर्चिला जात आहे.

# शिवछत्रपती मंडळातर्फे शिवजयंती

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर**



दरवर्षी प्रमाणे यावर्षीसुद्धा शिवजयंती उत्सव लोतवाडा व चांदखेड गावामध्ये साजरा करण्यात आला यामध्ये गाव स्वच्छता करुन गावातील सर्व पुतळ्यांना हारर्पन करुन संध्याकाळी वारकरी दिंडी काढण्यात आली व त्याचा समारोप गावांमध्ये शिव व्याख्याते श्री सौरभभाऊ वाघोडे यांचे शिवचरित्रावर व्याख्यान झाले व या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून श्री मधुकरराव इचे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून गावची जेष्ट श्री अंगतरावव भदे श्री अवधुतराव जयसिंगपुरे श्री अशोकराव देशमुख श्री भावराव रायबोले हे होते या कार्यक्रमाचे प्रस्तावित श्री कुलदीपभाऊ काळे यांनी केले त्यांनी पाहुण्याना शिव छत्रपती मंडळ राबवत असलेल्या उपक्रमाची माहिती दिली नंतर गावांमध्ये सर्वोच्च हरभरा पिकाचे एकरी १४ क्विंटल उत्पादन घेणारे यांना कृषी रत्न श्री पंजाबराव इंगळे यांचा व श्री ललीत पाटिल भांडे यांचा सत्कार करण्यात आला यानंतर कापूस पीकाचेएकरी १५.५ क्विंटल सर्वोच्च उत्पादन घेणारे यांचा कृषी रत्न पुरस्कार श्री अनिलभाऊ बानाइत व सुनिल पाटिल भांडे यांना कृषिरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले यांचा सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा प्रमुख पाहुणे व व्याख्याते श्री सौरभदादा वाघोडे यांच्या हस्ते करण्यात आला व लोतवाडा चांदखेड मधे शासकीय नोकरीवर रुजू झालेल्यातरुनांचा सन्मानचीन्ह शॉल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला यामध्ये लोतवाडा येथील समर्थ प्राकाशराव खराटे व रोहित संतोषभाऊ शिंदे अग्नीविर मध्ये तसेच वैष्णवी प्रशांत इचे भारतीय स्टेट बँक अमोल वानखडे आरोग्य विभाग अकोल व त्रिशूल शंकर कुराडे व अजय राजेश भांडे आरोग्य विभाग मुकुंदराव भदे अमेरिका येथे रोबोटिक इजिनियरींग या कार्यक्रमाला या कार्यक्रमाला पंच अनिकेत हरणे सुमित देशमुख वैभव मानकर प्रफुल्ल गावंडे मोहन गावंडे अंकुश प्रदीप मार्के अक्षय गावंडे सोहम देशमुख विक्री साबे रोहित ईचे सुमित शिंदे निशांत गावंडे सर्वेश मानकर यांनी पुर्ण करण्यासाठी महत्वाचे सहकार्य केले या कार्यक्रमाचे संचांलन हिंमत गवई व प्रज्वल हरणे यांनी केले व काकार्यक्रमाला मोठ्या संखेने गावकरी मंडळी उपस्थित होती.

दैनिक विदर्भ केसरी TODAY
चंद्रपूर

GOOD MORNING

## ऑनलाइन गुंतवणुकीने व्यावसायिकाला 11 कोटींचा गंडा

पुणे : निगडी येथील एका ५५ वर्षीय व्यावसायिकाची ऑनलाइन गुंतवणुकीच्या आमिषाने ११ कोटी रुपयांची फसवणूक झाली आहे. हा फसवणुकीचा प्रकार गेल्या तीन महिन्यांपासून अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने सुरू होता, अशी माहिती पोलिसांनी दिली. तक्रारदार हे पूर्वी चाकण एमआयडीसी येथील एका कंपनीचे संचालक होते. नोव्हेंबर महिन्यात त्यांच्याशी एका मेसेजिंग प्लॅटफॉर्मद्वारे संपर्क साधण्यात आला. आरोपींनी स्वतःला नामांकित गुंतवणूक संस्थेचे प्रतिनिधी भासवले. शेअर बाजारात तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळेल, असे आमिष त्यांना दाखवण्यात आले. विश्वास संपादन करण्यासाठी आरोपींनी कंपनीला 'सेबी' मान्यता असल्याचा दावा करत बनावट प्रमाणपत्रही पाठवले. त्यानंतर तक्रारदाराला एका ऑनलाइन ग्रुपमध्ये सामील करण्यात आले. या ग्रुपमध्ये इतर सदस्य स्वतःला गुंतवणूकदार भासवून शेअर बाजारातील ट्रेंड, आयपीओ आणि ट्रेडिंग रणनीतीवर चर्चा करत होते. आरोपींनी दिलेल्या लिंकवरून तक्रारदाराने एक मोबाईल ॲप डाउनलोड केले. या ॲपमध्ये गुंतवणुकीवर मोठा नफा मिळत असल्याचे दाखवण्यात येत होते. सुरुवातीला सुमारे ४० लाख रुपयांचा नफा खात्यात जमा झाल्याचे दिसल्याने तक्रारदाराचा विश्वास अधिक वाढला. यानंतर व्यावसायिकाने स्वतःच्या व्यवसायातील हिस्सा विकून आरोपींनी दिलेल्या विविध बँक खात्यांमध्ये टप्प्याटप्प्याने पैसे जमा केले. नोव्हेंबर ते ३१ जानेवारी या कालावधीत त्यांनी एकूण ११ कोटी रुपये हस्तांतरित केले.

## संक्षिप्त





### लोकवर्गणीच्या बळावर विकास ; इंदिरानगर मध्ये हनुमान मंदिर वॉल कंपाऊंड भूमिपूजन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : गडचिरोली शहरातील इंदिरानगर प्रभाग क्रमांक ३ येथे लोकवर्गणीतून उभारण्यात येत असलेल्या हनुमान मंदिराच्या वॉल कंपाऊंड बांधकामाचे भूमिपूजन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. परिसरातील नागरिकांच्या सहकार्याने साकार होत असलेल्या या उपक्रमामुळे मंदिर परिसराचे सौंदर्यीकरण व सुरक्षितता वाढणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या प्रसंगी बांधकाम सभापती अनिल कुनघाडकर (न.प.) तथा अध्यक्ष, हनुमान सेवा समिती इंदिरानगर व नगरसेवक सागर निबोंरकर यांच्या हस्ते विधिवत पूजा-अर्चा करून भूमिपूजन करण्यात आले. त्यांनी आपल्या मनोगतात मंदिर परिसराच्या विकासासाठी नागरिकांनी दिलेल्या लोकवर्गणीचे कौतुक करत, समाजाच्या एकोप्याचे हे उत्तम उदाहरण असल्याचे सांगितले. धार्मिक स्थळांच्या विकासातून सामाजिक एकात्मता अधिक दृढ होते, असेही त्यांनी नमूद केले.
यावेळी राजू बोबाटे, देवानंद खोब्रागडे, गजू विरवार, शंकर चिलबुले, संजय पिपरे, सुजित मेश्राम, राहुल गिरसावळे तसेच गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीत मंत्रोच्चार आणि पारंपरिक विधींनी कार्यक्रम पार पडला. मंदिर परिसरात उभारण्यात येणारे वॉल कंपाऊंड पूर्ण झाल्यानंतर भाविकांसाठी अधिक सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. लोकसहभागातून उभ्या राहत असलेल्या या बांधकामामुळे इंदिरानगर परिसरात धार्मिक व सामाजिक उपक्रमांना अधिक चालना मिळणार आहे. संपूर्ण कार्यक्रम उत्साह, एकोपा आणि भक्तिभावाच्या वातावरणात संपन्न झाला.




### स्वच्छतेवर मनपाची विशेष आमसभा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

अमरावती महानगरपालिकेने (मनपा) शहरातील स्वच्छतेच्या वाढत्या तक्रारींची दखल घेत २६ फेब्रुवारी रोजी विशेष आमसभा बोलावली आहे. महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११ वाजता ही सभा होणार असून, यात केवळ शहर स्वच्छतेच्या मुद्द्यांवर चर्चा करून उपाययोजना निश्चित केल्या जातील. या सभेसाठी सर्व नगरसेवकांना निमंत्रण पाठवण्यात आले आहे. पीठासीन सभापतींनी नगरसेवकांना आपापल्या प्रभागातील स्वच्छतेच्या समस्या आणि त्यावर अपेक्षित उपाययोजना सादर करण्याचे आवाहन केले आहे. यापूर्वी २० फेब्रुवारी रोजी झालेल्या मनपाच्या पहिल्याच आमसभेत अनेक नगरसेवकांनी स्वच्छतेचा मुद्दा उपस्थित केला होता. मात्र, त्यावेळी स्थायी समितीच्या १६ सदस्यांची आणि स्वीकृत सदस्यांची निवड करण्याला प्राधान्य देण्यात आले होते. त्यावेळी पीठासीन सभापतींनी स्वच्छतेच्या विषयावर विशेष सभा घेण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार, महापौर श्रीचंद तेजवानी यांनी २६ फेब्रुवारी रोजी विशेष आमसभेचे आयोजन करून दिलेला शब्द पाळला आहे.

### दलित वस्ती सुधार योजनेतील 670 कामांवरील स्थगिती उठवली

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**



अमरावती येथे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करण्यासाठी सन २०२५-२६ या वर्षाकरिता मंजूर करण्यात आलेल्या ६७० विकासकामांवरील स्थगिती उठवण्यात आली आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार कामांमध्ये योग्य तो बदल करून ही विकासकामे करण्यात येणार आहेत. यामुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांना वेग मिळणार आहे. जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या या योजनेंतर्गत सांडपाणी निचऱ्यासाठी नाली, पाणीपुरवठा, सिमेंट रस्ते, एलईडी लाईट आणि पेविंग ब्लॉक बसवणे यांसारख्या ६७० कामांची निवड करण्यात आली होती. मात्र, या कामांमध्ये रस्ते आणि पेविंग ब्लॉकच्या कामांचे प्रमाण जास्त असल्याने ही कामे बदलविण्याची सूचना पालकमंत्री बावनकुळे यांनी केली होती. पालकमंत्र्यांनी सांडपाणी व्यवस्थापन, गटार व्यवस्था आणि पाणीपुरवठा यासारख्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देण्याचे निर्देश दिले होते. या निर्देशानुसार, गट विकास अधिकाऱ्यांनी जुन्या यादीतील ११२ कामांमध्ये बदल करून नवीन कामांचे प्रस्ताव सादर केले आहेत. त्यामुळे आता सर्व ६७० विकासकामे सुरू होणार आहेत. समाजकल्याण अधिकारी डी.एम. पुंड यांच्या माहितीनुसार, या कामांमध्ये रस्ते आणि पेविंग ब्लॉकऐवजी आता आरोग्य आणि स्वच्छतेशी संबंधित कामांमध्ये गटारे, पाणीपुरवठा यावर भर दिला जाणार आहे. सर्व कामांचे जिओ टॅगिंग आणि छायाचित्र पालकमंत्र्यांसमोर सादर करण्यात आले आहेत. बदललेल्या ११२ कामांचे प्रस्ताव ग्रामपंचायत ठराव, प्रमाणपत्रे आणि अंदाजपत्रकासह तातडीने प्रशासकीय मान्यतेसाठी मागविण्यात आले आहेत.

# केळी–संत्रा लागवडीची देयके रखडली

## शिवसेना किसान सेनेचा आंदोलनाचा इशारा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

संग्रामपूर : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (म.ग्रा.रो.ह.यो.) अंतर्गत संग्रामपूर तालुक्यात सन २०२३ ते २०२५-२६ या कालावधीत करण्यात आलेल्या केळी व संत्रा फळबाग लागवडीच्या कुशल मजुरीची देयके अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली नसल्याची बाब समोर आली आहे. यासंदर्भात शिवसेना किसान सेना यांच्या वतीने तालुका कृषी अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, संबंधित शेतकऱ्यांनी फळबाग लागवडीची कामे पूर्ण करून आवश्यक कागदपत्रे कृषी विभागाकडे सादर केली आहेत. मात्र सन २०२३ ते २०२५-२६ या कालावधीतील कुशल मजुरीच्या बिलांची रक्कम अद्याप खात्यात जमा झालेली नाही. त्यामुळे प्रलंबित देयके तात्काळ जमा करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. ६ मार्च २०२६ पर्यंत संबंधित रक्कम जमा न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. हे निवेदन शिवसेना किसान सेनेचे उपजिल्हाप्रमुख अमोल ठाकरे, विधानसभा संघटक कैलास कडाळे,



उपतालुका प्रमुख शिवाजी अढाव यांच्यासह विठ्ठल गोतमारे, भगवान गोतमारे, प्रकाश गोतमारे, सुनील मुकुंद, गजानन वानखडे, सिद्धार्थ वानखडे, रामदास गोतमारे, संतोष साखरे, विजय गोतमारे, संजय वानखडे, मनोर अवचार, विक्की पिसे, सतीश गोल्हर आदींच्या स्वाक्षऱ्यांसह २३ फेब्रुवारी रोजी सादर करण्यात आले. दरम्यान, या प्रकरणी प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळावा, अशी अपेक्षा फळबाग शेतकरी व्यक्त करत आहेत.

### दरोड्याच्या तयारीत असलेल्या चोरट्यांची टोळी गजाआड

पुणे : वारजे माळवाडी पोलिसांनी दरोड्याच्या तयारीत असलेल्या एका टोळीला अटक केली आहे. या चोरट्यांकडून कोयता, तलवार आणि मिरची पूड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये प्रतीक संजय हंकारे (वय १९), सूरज राणा गिरी (वय २३, रा. वडगाव शेरी), संस्कार युवराज एडके (वय १९), विशाल उत्तम वावळकर (वय २३) आणि ऋत्विक राजू जंगम (वय १९, तिघे रा. वारजे माळवाडी) यांचा समावेश आहे. पोलीस कर्मचारी निखिल तांगडे यांनी याबाबत वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याच पार्श्वभूमीवर, वारजे भागातील श्री छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलावाजवळ चोरट्यांची टोळी दरोड्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

## मूर्तिजापूरमध्ये बंजारा समाजाच्या कुलदैवत माता जगदंबा देवीची प्राणप्रतिष्ठा उत्साहात

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

मुर्तीजापुर प्रतिनिधी : मूर्तिजापूर : बंजारा समाजाचे श्रद्धास्थान व कुलदैवत असलेल्या माता जगदंबा देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा मूर्तिजापूर येथे अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात नुकताच पार पडला. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मागील प्रशस्त जागेत उभारण्यात आलेल्या भव्य मंदिरात हा ऐतिहासिक सोहळा संपन्न झाला.

संत संत सेवालाल महाराज पगडी तसेच संत रामराव बापू महाराजांच्या भोग परंपरेच्या साक्षीने धर्मगुरू महंत परमपूज्य नेहरू बापू महाराज यांच्या हस्ते विधिवत पूजा-अर्चना व मंत्रोच्चारात प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. ढोल-ताशांचा निनाद, जयघोष आणि भक्तांच्या डोळ्यांतील आनंदाश्रूंनी परिसर भारावून गेला होता. या सोहळ्यास मूर्तिजापूरच्या लोकप्रिय आमदार हरीश पिंपळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी त्यांनी मंदिर परिसरासाठी कंपाऊंड व पेव्हर ब्लॉक कामांसाठी २० लाख रुपयांचा निधी जाहीर करून समाजाच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे दर्शविले. तसेच सभागृह उभारणीसाठीही निधी देण्याची घोषणा करण्यात आली. कार्यक्रमाला बाबूसिंग पवार, बंडूभाऊ राठोड, श्रीमती दमयंतीबाई रामसिंह राठोड, आर. एस. जाधव साहेब, महादेराव पवार, डॉ आर जी राठोड महाविद्यालयाच प्राचार्य डॉ. चर्जन, , भाजपा नगरसेवक राम जोशी, नामदेव चव्हाण, गजानन नाकट यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ताराम पवार यांनी प्रभावीपणे केले. पी.पी. राठोड यांनी प्रास्ताविकातून मंदिर उभारणीमागील समाजभावना मांडली, तर माजी उपनगराध्यक्ष सुनील पवार यांनी आभार प्रदर्शन केले. माता जगदंबा ही बंजारा समाजाची कुलदेवता असून, तिच्या मंदिराच्या उभारणीमुळे समाजाला एकत्र येण्यासाठी आणि सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी नवे आध्यात्मिक केंद्र लाभले आहे. या सोहळ्याने बंजारा समाजातील ऐक्य, श्रद्धा आणि संस्कृतीचे दर्शन घडविले. या कार्यक्रमाला बंधारा समाजाची भरपूर उपस्थिती होती या कार्यक्रमात महाप्रसादाचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला

यावेळी सभागृह बांधण्याकरता धर्मगुरू महंत बाबू सिंग महाराज विधान परिषद सदस्य यांनी निधी देण्याचे त्यांचे शिष्य महंत परमपूज्य नेहरू महाराज यांनी यावेळी घोषित केले भक्ती, परंपरा आणि समाजएकतेचा संगम असलेला हा प्राणप्रतिष्ठा सोहळा मूर्तिजापूरच्या धार्मिक व सामाजिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदविला जाईल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



## स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानात गडचिरोलीचा राज्यस्तरीय गौरव..!

### दुर्गम भागातील आरोग्य सेवेची दखल महाआरोग्य सन्मान २०२६ ने जिल्ह्याचा सन्मान...!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : राज्य शासनाच्या वतीने आयोजित वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न व महाआरोग्य सन्मान २०२६ पुरस्कार वितरण सोहळ्यात स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानांतर्गत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल गडचिरोली जिल्ह्याचा राज्यस्तरावर विशेष गौरव करण्यात आला. दुर्गम व अतिदुर्गम भागात माता व बाल आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी राबविण्यात आलेल्या प्रभावी उपक्रमांची राज्य शासनाने दखल घेतली. राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर व आरोग्य राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते जिल्ह्याचा विशेष सन्मान करण्यात आला.

महाआरोग्य सन्मान २०२६ प्राप्त मानकरी डॉ. अमोल कुकुडकर, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र पेरमिली. सार्वजनिक आरोग्य सेवा बळकटीकरण, प्रतिबंधात्मक उपाययोजना, जनजागृती मोहिमा व गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा प्रभावीपणे उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांना महाआरोग्य सन्मान २०२६ प्रदान करण्यात आला. पार्वती तिम्मा, आशा स्वयंसेविका, प्राथमिक आरोग्य केंद्र लाहेरी. अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भागात घरोघरी भेट देत माता व बाल आरोग्य सेवा सुनिश्चित केल्याबद्दल त्यांचा महाआरोग्य सन्मान २०२६ देऊन गौरव करण्यात आला.

स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानांतर्गत राबविण्यात आलेली प्रमुख कार्यवाही या अभियानात



गडचिरोली जिल्ह्याने उल्लेखनीय यश संपादन केले, असून त्यामागे आरोग्य विभागाची शिस्तबद्ध आणि परिणामकारक कार्यपद्धती आहे. सर्वकष आरोग्य तपासणी दुर्गम भागातील गरोदर माता व किशोरवयीन मुलींची घरोघरी जाऊन तपासणी करण्यात आली. हिमोग्लोबिन (Hb), रक्तदाब (BP) आणि इतर आवश्यक चाचण्यांवर विशेष भर देण्यात आला. ॲनिमिया (रक्तक्षय) निर्मूलन मोहिम महिलांमधील रक्तक्षय कमी करण्यासाठी लोहयुक्त गोळ्यांचे (IFA) वितरण तसेच संतुलित आहाराबाबत मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात आली. डिजिटल ट्रॅकिंग प्रणाली - प्रत्येक लाभार्थी महिलेची आरोग्य नोंदणी व पाठपुरावा डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अचूकपणे करण्यात आला, ज्यामुळे उपचार प्रक्रियेत सातत्य राखता आले. समुपदेशन व जनजागृती- आशा स्वयंसेविकांमार्फत माता बैठकां द्वारे स्तनपान, लसीकरण, स्वच्छता व पोषण याबाबत प्रभावी जनजागृती करण्यात आली. संस्थात्मक प्रसूतीस प्रोत्साहन - सुरक्षित प्रसूतीसाठी मातांना आरोग्य केंद्रांपर्यंत पोहोचविण्याच्या उपाययोजनांमुळे संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले. सदर अभियानासाठी डॉ. स्मिता साळवे व डॉ. प्रेरणा देवतळे यांनी नोडल अधिकारी म्हणून प्रभावी समन्वय साधत जिल्हाभर अभियानाची यशस्वी अंमलबजावणी केली. सुहास गाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली म्हणाले, की गडचिरोली जिल्ह्याचे भौगोलिक स्वरूप आव्हानात्मक असले तरी आरोग्य यंत्रणेने शेवटच्या घटकापर्यंत सेवा पोहोचवली आहे. स्वस्थ नारी हेच सशक्त कुटुंबाचे मूळ आहे, हे आपल्या कार्यातून सिद्ध झाले आहे. हा पुरस्कार आपल्या संपूर्ण टीमच्या निष्ठेची पोचपावती आहे. डॉ. प्रताप शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सांगितले, की दुर्गम भागातील माता मृत्यू व बाल मृत्यू दर कमी करण्याच्या आपल्या संकल्पाला या सन्मानामुळे नवी ऊर्जा मिळाली आहे. आरोग्य विभागातील प्रत्येक घटकाने अहोरात्र परिश्रम घेतले आहेत. या यशामागे जिल्ह्यातील सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक तसेच विशेषतः आशा स्वयंसेविकांचे योगदान मोलाचे आहे. त्यांच्या जिद्द, चिकाटी व सेवाभावामुळे गडचिरोली जिल्ह्याचे नाव राज्यस्तरावर अभिमानाने घेतले जात आहे, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रताप शिंदे यांनी कळविले आहे.

# विषमुक्त शेतीकडे मूर्तिजापूर तालुक्याचे खंबीर पाऊल; ७५ शेतकऱ्यांचे तीन दिवसीय प्रशिक्षण उत्साहात

## पाणी फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली निसर्गपूरक शेतीचा संकल्प; ग्रामपुत्र परिवाराचा पुढाकार

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

मूर्तिजापूर : रासायनिक शेतीच्या विळख्यातून बाहेर पडून निसर्गपूरक आणि शाश्वत शेतीकडे वळण्यासाठी मूर्तिजापूर तालुक्यातील ७५ शेतकऱ्यांनी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. पाणी फाउंडेशनच्या वतीने बडनेरा (दुर्गापूर) येथील कृषी विज्ञान केंद्रात आयोजित करण्यात आलेले तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिर नुकतेच उत्साहात संपन्न झाले. २० ते २२ फेब्रुवारी दरम्यान चाललेल्या या शिबिरात शेतकऱ्यांनी 'विषमुक्त अन्ना'साठी कंबर कसली आहे. शासकीय यंत्रणांचा सक्रिय सहभाग या उपक्रमाला कृषी विभाग, उमेद, आत्मा विभाग आणि महाराष्ट्र



शासनाच्या विविध यंत्रणांचे मोलाचे सहकार्य लाभले. पाणी फाउंडेशनच्या अनुभवी टीमने शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कृतीतून आणि तांत्रिक माहितीद्वारे मार्गदर्शन केले. शेतीचा खर्च कमी करून उत्पादन कसे वाढवता येईल, यावर या प्रशिक्षणात प्रामुख्याने भर देण्यात आला. रासायनिक शेतीचे दुष्परिणाम: चिंतेचा विषय प्रशिक्षण सत्रात तज्ज्ञांनी रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे ओढवलेल्या संकटावर प्रकाश टाकला. यामध्ये प्रामुख्याने खालील मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली:

जमिनीचा पोत: रासायनिक द्रव्यांमुळे मातीचा कस कमी होऊन जमीन नापीक होत आहे.

आरोग्य संकट: अन्नामध्ये विषारी अंश मिसळल्यामुळे गंभीर आजारांचे प्रमाण वाढत आहे.

पर्यावरण ऱ्हास, जलस्रोत प्रदूषित होत असून निसर्गाचे चक्र बिघडत चालले आहे.

उपस्थित शेतकऱ्यांनीही कबूल केले की, रासायनिक शेतीमुळे खर्च वाढत असून जमिनीची सुपीकता धोक्यात आली आहे. विषमुक्त शेतीसाठी पंचसूत्री प्रशिक्षणार्थी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी आवश्यक असलेल्या महत्त्वपूर्ण बाबींचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले, ज्यात प्रामुख्याने:
१. जैविक खत निर्मिती आणि नैसर्गिक कीड नियंत्रण.
२. योग्य पीक नियोजन आणि पाणी व्यवस्थापन.
३. मृदा संवर्धन (माती वाचवा) मोहिमेचे महत्त्व.
४. स्थानिक संसाधनांचा वापर करून खर्च कमी करणे.

ग्रामपुत्र परिवाराचा यशस्वी पुढाकार तालुक्यातील शेतकऱ्यांना संघटित करण्यासाठी आणि या चळवळीला गती देण्यासाठी *'ग्रामपुत्र परिवार'*ने विशेष कष्ट घेतले. या मोहिमेमुळे शेतकऱ्यांमध्ये नवा उत्साह संचारला असून, भविष्यात मूर्तिजापूर तालुका विषमुक्त अन्न निर्मितीचे केंद्र बनेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. निसर्गाचा समतोल राखून, विषमुक्त अन्नाद्वारे निरोगी समाज आणि समृद्ध शेतकरी घडवण्याच्या या आंदोलनाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू TODAY

गडचिरोली GOOD MORNING

## पीएमपी प्रवासी महिलेचे दागिने चोरणारे अटकेत: तीन गुन्हे उघड

पुणे : पीएमपी बसमधील प्रवासी महिलांचे दागिने चोरून पसार झालेल्या दोन चोरट्यांना विश्रामबाग पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून ५ लाख ८७ हजार रुपयांचे दागिने जप्त करण्यात आले असून, त्यांनी अशा प्रकारचे तीन गुन्हे केल्याचे तपासात उघड झाले आहे. बसवराज विजय सुतार (वय २५) आणि कृष्णा रमेश माने (वय ४५, दोघे रा. मुंढवा) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. वारजे जकात नाका ते पुणे स्टेशन या मार्गावरील पीएमपी बसमधून प्रवास करणाऱ्या एका महिलेच्या हातातील सोन्याची बांगडी केळकर रस्त्यावर कटरने कापून चोरून नेण्यात आली होती. या प्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी केळकर रस्ता परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. पोलीस कर्मचारी अर्जुन थोरात यांना मिळालेल्या माहितीनुसार, सुतार आणि माने यांनी महिलेचे दागिने चोरल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने दोघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान, त्यांनी पीएमपी प्रवासी महिलांकडून दागिने चोरीचे तीन गुन्हे केल्याची कबुली दिली. दरम्यान, रास्ता पेठेत एकाला धमकावून त्याच्याकडील ३० हजार रुपयांची रोकड लुटणाऱ्या चोरट्यांना गुन्हे शाखेने अटक केली आहे. अस्लम इस्माइल शेख उर्फ बिल्ला (वय २२) आणि रेहान जमील शेख उर्फ रिहान (वय १९, दोघे रा. म्हाडा वसाहत, ससाणेनगर, हडपसर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न

## माझी बदनामी हा राजकीय सुडाचा डाव ; अगरबत्ती प्रकल्पाची सीबीआय, ईडी किंवा एसआयटी चौकशी करा : नगरसेवक आशिष पिपरे

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

चामोर्शी : ‘ मेक इन गडचिरोली‘ अंतर्गत राबविण्यात आलेल्या अगरबत्ती प्रकल्पावरून सुरू असलेल्या आरोपांच्या मालिकेला आता एक नवीन वळण मिळाले आहे. चामोर्शी चे नगरसेवक आशिष पिपरे यांनी आपल्यावरील सर्व आरोप फेटाळून लावत, या प्रकरणाची CBI, ED किंवा SIT मार्फत सखोल चौकशी करण्याची मागणी स्वतःहून प्रशासनाकडे केली आहे. आगामी नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपली राजकीय व सामाजिक प्रतिमा मलीन करण्यासाठी विरोधकांनी रचलेला हा एक ‘सुनियोजित कट’ असल्याचा दावा त्यांनी केला आहे. नगरसेवक पिपरे यांनी स्पष्ट केले की, माजी आमदार डॉ. देवराव होळी यांच्या संकल्पनेतून

### घोटाळ्यांचे उघडकीकरण

▪ पिपरे यांनी नुकतेच बाजार समिती आणि खरेदी विक्री संघातील मोठे घोटाळे बाहेर काढले आहेत. यात तालुक्यातील एका ‘स्वयंघोषित सहकार महर्षी’वर गुन्हे दाखल करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. या मोठ्या नेत्यांचे लक्ष विचलित करण्यासाठी आणि स्वतःचा बचाव करण्यासाठी महिलांना पुढे करून हे राजकारण खेळले जात असल्याचा आरोप पिपरे यांनी केला. सोशल मीडियाच्या माध्यमातून बदनामी करणाऱ्यांविरुद्ध आशिष पिपरे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्यांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दाखल केली असून, संबंधित व्यक्तींना वकीला मार्फत नोटीस पाठवली आहे. लवकरच न्यायालयात अब्रुनुकसानीचा दावा दाखल करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. तसेच “ मी कोणत्याही चौकशीला घाबरत नाही. उलट मीच मागणी करतो की, या प्रकरणाची SIT चौकशी व्हावी, जेणेकरून दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल. राजकीय विरोधकांना जशास तसे उत्तर दिले जाईल. संपूर्ण समाज आणि जनता माझ्या पाठीशी आहे.” असेही आशिष पिपरे यांनी म्हटले आहे.



आणि जिल्हा उद्योग केंद्र,बँक ऑफ महाराष्ट्र व इतर बँकांच्या सहकार्याने हा प्रकल्प राबविण्यात आला.

मशीन खरेदीचा खुलासा:- सुरुवातीला मशीनचे कोटेशन 1,18,000 रुपये देण्यात आले होते. त्यामुळे आपण स्वतः पुढाकार घेऊन इंडियामार्ट व ऑनलाइन दर तपासले असता मशीन 90,000 रुपयांत उपलब्ध असल्याचे समोर आले. त्यामुळे महिलांच्या हितासाठी 90,000 रुपयांतच मशीन खरेदी करण्यात आल्या.

करार आणि उत्पादन : - गेल्या तीन वर्षांत या मशीनमधून 4 - 5 टन माल उत्पादन झाला असून, मशीनी अजूनही सुस्थितीत आहेत.

याबद्दल महिलांनी स्वतःच १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र लिहून दिले आहे,असेही आशिष पिपरे यांनी नमूद केले. आपल्या विरोधात तक्रार करणाऱ्या कविता किरमे आणि चंद्रशेखर म्हस्के यांच्यावर पिपरे यांनी गंभीर आरोप केले आहेत. “ हे दोघे स्वतःच " बंटी - बब्ली " असून त्यांनी रोझवॅली आणि चिटफंडच्या माध्यमातून गरिबांची करोडोंनी फसवणूक केली आहे. त्यांच्याविरोधात अनेक पोलीस तक्रारी आहेत. निवडणुकीतील पराभवाचा बदला घेण्यासाठी ते आता निराधार महिलांची दिशाभूल करून मला बदनाम करत आहेत,” असे आशिष पिपरे म्हणाले. तसेच आशिष पिपरे यांनी या आंदोलनामागचे राजकीय कारणही स्पष्ट केले आहे.

नगरपंचायत निवडणूक:- आगामी चामोर्शी नगरपंचायत निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी पिपरे प्रबळ उमेदवार आहेत.60 ते 70 टक्के मतदार असलेल्या तेली समाजाचे ते नेतृत्व (महाराष्ट्र तैलिक महासभा अध्यक्ष) करत असल्याने त्यांना रोखण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## तुमरगुंडा गावाजवळ चहाच्या दुकान जवळ मोटारसायकलचा अपघात

### तीन जन जखमी ; एकाचा झाला मृत्यू

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

एटापल्ली : दिनांक २२-०२-२६ रोजी १२:०० वाजता, नोंदणी क्रमांक MH-33-AG-3402 असलेली एक मोटारसायकल, जी (ट्रिपल सीट)तीन जन गाडीवर घेऊन जात असताना तुमरगुंडा गावाहून परसलगोंदी गावाकडे जात होती, त्यानंतर गाडी रस्त्यावर घसरली. परिणामी,bसर्वजण मोटारसायकलवरून पडले आणि जखमी झाले. जखमींना तत्काळ मदत करण्यात आली. आणि जखमींना दवाखान्यात भरती करण्यात आले. जखमींना पुढील वैद्यकीय उपचारांसाठी पेट्रोलिंग वाहनाने तात्काळ रुग्णालयात हलविण्यात आले. गस्त पथकाने तातडीने घटनास्थळी पोहोचून आवश्यक ती मदत केली. जखमींना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आणि एका मुलीला वैद्यकीय तपासणी आणि उपचारांसाठी एटापल्ली रुग्णालयात दाखल करण्यात आले. आणि एका मुलाला आणि मुलीला हेडरी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

वाहनस्वारांची माहिती---

१. बन्नी दुर्वा (जखमी) परसलगोंदी

२. मिस करिश्मा दुर्वा आधार नुसार मीना दुर्वा (जखमी) परसलगोंदी

३. गाडी चालक रूपेश गावडे गुंडापूर गावातील असून सदर जखमींना प्रथमोपचारानंतर पुढील उपचारांसाठी गडचिरोली येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात येथे पाठवण्यात आले आहे. प्राप्त माहितीनुसार एक जण मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.






## कुरखेडा तहसिलदारांकडून जिल्हाधिका-याच्या पत्राला केराची टोपली

### त्रस्त शेतकरी त्रिभुवन तुकाराम बाळबुध्दे यांचा आरोप....!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : दिनांक 24.12.2025 पासून त्रिभुवन तुकाराम बाळबुद्धे मु.पो. अंगारा ता. कुरखेडा जिल्हा गडचिरोली यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अन्नत्याग आंदोलनाला बसुन आपल्या नावे झालेले फेरफार खारीज करुन इतर मागण्यांबाबत न्याय मिळविण्यासाठी अथक प्रयत्न केला. त्यावेळी त्यांच्या या आंदोलनाची मा. जिल्हाधिकारी यांनी दखल घेऊन सदर प्रकरणाची नियमानुसार आवश्यक कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत सादर करण्यात यावा, असा पत्र दि.१९




जाने. २०२६ ला कुरखेडा तहसीलदार यांना देण्यात आले असतांनाही कुरखेडा तहसीलदारांकडून कुठल्याही प्रकारची दखल न घेता आजपर्यंत कुठलीही कार्यवाही करण्यात आली नाही.

त्याचप्रमाणे तक्रारदार बाळबुद्धे यांनी दिनांक १८ फेब्रुवारी रोजी तहशीलदारांना स्मरण पत्र लिहून त्यात आपल्या नावाने झालेले फेरफार मान्य नसल्याचे कळवुन प्रशासनाकडून हुकुमशाही केली जात असल्यामुळे हुकुमशाही मध्ये जिवन जगण्यापेक्षा आपले जिवन संपविलेले बरे असे कळविले असुनही तहसीलदारांकडून कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. तसेच सदर शेतकऱ्याकडुन मा. तहशीलदारांना विचारणा केली असता त्यांच्याकडून त्यांच्या मागण्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शेतकरी त्रिभुवन तुकाराम बाळबुध्दे यांनी प्रशासनाच्या संतगतीत चालणाऱ्या कार्यवाहीला कंटाळून आता अतीशय टोकाचे पाऊल उचलावे लागनार कि, काय अशा विचारात पडल्याचे त्यांच्याकडून बोलुन दाखवले जात आहे.

## कॉपी प्रकाराबाबत केंद्र संचालकांसह चार जणांवर गुन्हे दाखल

### सीईओंच्या भेटीत चामोर्शी येथील जा. कृ. बोमनवार विद्यालयाच्या केद्रांवर कॉपीचा प्रकार

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

गडचिरोली : बारावीच्या राज्यशास्त्र विषयाच्या परीक्षेदरम्यान प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांचे फोटो काढून चाटजीपीटीच्या माध्यमातून उत्तरे शोधून कॉपी केल्याचा प्रकार चामोर्शी तालुक्यातील जा. कृ. बोमनवार विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, (केंद्र क्र. ०६१५) येथे उघडकीस आला असून याप्रकरणी संबधित केद्राच्या संचालकांसह चार जणांवर २० फेब्रुवारी रोजी रात्री उशीरा चामोर्शी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले. या कारवाईमुळे शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

### निलंबनाचा प्रस्ताव तयार

▪ सदर प्रकरणातील तीन शिक्षक व एक शिपाई अशा एकूण चारही कर्मचाऱ्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्याला शनिवारी सायंकाळी उशिरा मंजुरी देण्यात आल्याची माहीती शिक्षण विभागाच्या सुत्रांकडून मिळाली.

महेंद्र वसंतराव बुर्लावार, सहायक शिक्षक तथा केद्रसंचालक, शिक्षक तथा पर्यवेक्षक सुशील रामचंद्र लांजेवार, शिक्षक महेंद्र बाबुराव किरमे व शिपाई सूरज प्रमोद केळझरकर या चौघांवर परीक्षेमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याचा अधिनियम १९८२ नूसार चामोर्शी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सदर प्रकराबाबत चामोर्शीचे गटशिक्षणाधिकारी सुधीर आखाडे यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. दरम्यान कॉपीचा हा प्रकार १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४. ५० वाजताच्या सुमारास उघडकीस आला. सकाळी रसायनशास्त्र व दुपारी ३ ते ५ या वेळेत राज्यशास्त्र विषयाचा पेपर सुरू होता. दरम्यान जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे यांनी सदर केंद्राला आकस्मिक भेट दिली. यावेळी सदर प्रकार उजेडात आला. चामोर्शी येथील जा. कृ. बोमनवार विद्यालयाच्या केद्रांवर कॉपीचा सदर प्रकार आढळून आल्यानंतर शिक्षण विभागाच्या वतीने सखोल चौकशी करण्यात आली. दरम्यान सदर केद्रावरचे केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व कर्तव्यावरील सर्व कर्मचारी बदलविण्यात आले आहे. या केद्रांवर ज्या शाळांचे विद्यार्थी आहेत, त्या शाळेव्यतिरिक्त इतर शाळांच्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी वासुदेव भूसे यांनी बोलताना दिली.

# सामान्यांना वेगळा न्याय आणि मोठ्यांना वेगळा का ?

## नियमानुसार राष्ट्रीय महामार्गावर गतिरोधक उभारणे मनाई असेल तर गडचिरोली ते नागपूर रोडवर गतिरोधक कसा?

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 353C वरील गतिरोधकाच्या मुद्द्यावरून गडचिरोलीत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या मुख्य कॅरेजवेवर गतिरोधक उभारण्यास केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाच्या २९ ऑगस्ट २०१६ च्या परिपत्रकानुसार तसेच सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या रस्ता सुरक्षा समितीच्या निर्देशांनुसार स्पष्ट मनाई असताना, शहरालगत असलेल्या एका नामांकित शाळेसमोर गतिरोधक उभारण्यात आल्याची बाब उघडकीस आली आहे. या संदर्भात साखरा (ता. जि. गडचिरोली) येथील रहिवासी दिनेश बाबाराव बोरकुटे यांनी मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, गडचिरोली आणि कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग



विभाग, गडचिरोली यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर करून उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे. साखरा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ही राष्ट्रीय महामार्गापासून अवघ्या सुमारे २० फूट अंतरावर आहे. विद्यार्थ्यांना दररोज महामार्ग ओलांडून शाळेत जावे लागते. या मार्गावर जड व वेगवान वाहनांची सततची वर्दळ असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत पालक आणि स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त होत होती. विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये म्हणून शाळेसमोर योग्य सुरक्षात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक पातळीवरून वारंवार करण्यात आली होती. दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा रस्ता सुरक्षा समितीकडे लेखी निवेदन देण्यात आले होते. त्यानंतर मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा रस्ता सुरक्षा समिती यांनी दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, गडचिरोली यांना आवश्यक कार्यवाहीबाबत पत्र पाठविले. मात्र दि. २१ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून प्राप्त झालेल्या उत्तरात सर्वोच्च न्यायालय नियुक्त रस्ता सुरक्षा समितीचे निर्देश आणि २९ ऑगस्ट २०१६ चे परिपत्रक यांचा उल्लेख करून राष्ट्रीय महामार्गाच्या मुख्य कॅरेजवेवर गतिरोधक उभारणे प्रतिबंधित असल्याचे स्पष्ट करण्यात आले. विभागाच्या म्हणण्यानुसार, गतिरोधकांमुळे वेगवान वाहतुकीत अडथळा निर्माण होऊन अपघाताची शक्यता वाढू शकते. मात्र याच राष्ट्रीय महामार्गावर दुसऱ्या एका नामांकित शाळेसमोर आधीपासून गतिरोधक अस्तित्वात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेबाबत संभ्रम आणि नाराजी निर्माण झाली आहे. जर नियमांनुसार राष्ट्रीय महामार्गावर गतिरोधक उभारणे मनाई असेल, तर संबंधित ठिकाणी तो कोणत्या परवानगीने आणि कोणत्या नियमांच्या आधारे उभारण्यात आला? आणि जर तो नियमबाह्य असेल, तर त्याविरुद्ध आजपर्यंत कोणतीही कारवाई का करण्यात आली नाही? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. निवेदनात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, कायदे व नियम सर्वांसाठी समान असले पाहिजेत. एका ठिकाणी नियमांचा आधार घेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठीची मागणी नाकारली जाते, तर दुसऱ्या ठिकाणी त्याच नियमांचे उल्लंघन कसे सहन केले जाते? या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करून गतिरोधक उभारणी प्रक्रियेत सहभागी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि आवश्यक ती कायदेशीर कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. हे प्रकरण केवळ एका गतिरोधकापुरते मर्यादित नसून प्रशासनातील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नियमांची समान अंमलबजावणी यांच्याशी निगडित आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न प्राधान्याने सोडविताना कायद्याचे काटेकोर पालन होणेही तितकेच आवश्यक आहे. आता संबंधित विभाग या प्रकरणात कोणती ठोस पावले उचलतो, दोषींवर प्रत्यक्षात कारवाई होते की नाही आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी कोणते पर्यायी उपाय तत्काळ राबविले जातात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त





### राष्ट्रीय मानवाधिकार संघठन (असो.) नई दिल्ली जिल्हा गडचिरोली च्या वतीने माहिती मार्गदर्शन कार्यशाळा व बैठक!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : दिनांक 22 फेब्रुवारी 2026 रोजी गडचिरोली येथे राष्ट्रीय मानवाधिकार संघटन (असो. ) नई दिल्ली, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ. प्रणय खुणे यांच्या आदेशानुसार गडचिरोली जिल्हा मानवाधिकार संघठनेचे वतीने नवेगाव कॉम्प्लेक्स- मुरखळा येथे संघटनेची नवीन कार्यकारणी बैठक व संघटन माहिती मार्गदर्शन कार्यशाळा संप्पन्न झाली. या बैठक व कार्यशाळेत संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमेश अधिकारी, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मनीषाताई मडावी शहर कार्यकारिनी अध्यक्ष भूषणा खेडेकर, राणी गोपशेट्टीवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये घेण्यात आली. यावेळी नवेगाव मुरखळा प्रभागातील अनेक महिला व पुरुष उपस्थित होते. सर्वांना राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेत प्रवेश देण्यात आला. उपस्थितांना संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमेश अधिकारी, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा मनीषा मडावी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी गडचिरोली शहरातील प्रत्येक प्रभागात राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेची कार्यकारिणी तयार करण्यात येईल आणि विविध समस्या बाबत राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्यात येईल असे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले. व संघटनेबाबत अधिक माहिती व मार्गदर्शन देण्यात आले. यावेळी जया मडावी, प्रभा किरंगे, पायल बारसिंगे, प्रतिभा शेंडे, जयश्री कुळमेथे, वैशाली कोसरे, वंदना वाघाडे, ममता आऊतकर, हिरा मेश्राम, रविंद्र डोंगरे, पवन गोपशेटवार, जयेंद्र राऊत मोठ्या प्रमाणात महिला नागरिकांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला.



### बिबटच्या प्रतिहल्लात झालेल्या जखमी भाजपा पदाधिकाऱ्यांनी घेतली भेट

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

कूरखेडा : तालूका मूख्यालयापासून अगदी दोन कीलोमीटर अंतरावर असलेल्या धमदीटोला शेतशिवारात मका पीकात दडून असलेल्या बिबट या हिंस्र वन्य प्राण्याला हूसकावून लावताना बिबटने प्रतिहल्ला केल्याने दोन इसम जखमी झाल्याची घटणा दिनांक 22 फेब्रुवारी रोज रविवार सकाळचा सूमारास घडली. कुरखेडा उपजिल्हा रुग्णालय भरती असलेल्या या जखमी रुग्णांची भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष माजी पंचायत समिती सदस्य चांगदेव फाये आरोग्य व स्वच्छता सभापती सागर निरंकारी सेवानिवृत्त मुख्याध्यापक भाजपचे आदिवासी नेते कृष्णा चंद्रमा शहर महामंत्री मंगेश मांडवे आदी पदाधिकांनी आज कुरखेडा उपजिल्हा रुग्णालयात भेट घेतली. व आरोग्याची विचारपूस केले. यावेळी वनविभागाच्या अधिकारी यांच्या सोबत संपर्क साधून जखमी व्यक्तींना व जनावरांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत देण्यात यावी व त्यांना दिलासा घ्यावा अशी मागणी भारतीय जनता पार्टी तालुका तथा माजी पंचायत समितीचे सदस्य चांगदेव फाये आरोग्य व स्वच्छता सभापती सागर निरंकारी कृष्णाजी चंद्रमा, मंगेश मांडवे व उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केली आहे. यावेळी जखमीचे कुटुंबीय नातेवाईक उपस्थित होते.




### आरोग्य सेवेसाठी गडचिरोलीत "आमदार वैद्यकीय सहाय्यता" कक्षाची निर्मिती

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : "रुग्णसेवेचा महायज्ञ: गडचिरोलीच्या जनतेसाठी 'आमदार वैद्यकीय सहाय्यता कक्ष' समर्पित!" गडचिरोली विधानसभा क्षेत्रातील तमाम माता-भगिनी, युवक मित्र आणि वडीलधाऱ्या मंडळींच्या आरोग्याची चिंता मिटवण्यासाठी आज एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. आरोग्याच्या संकट काळात सामान्य माणसाला आधार मिळावा, उपचारांसाठी योग्य दिशा मिळावी आणि आर्थिक विवंचनेत असलेल्या रुग्णांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा, या उद्देशाने आज 'आमदार वैद्यकीय सहाय्यता कक्ष' आणि त्याच्या अधिकृत हेल्पलाईन नंबरचे (88 08 04 08 04) भव्य लोकार्पण करण्यात आले. हे केवळ कार्यालय नसून, गडचिरोलीच्या जनतेसाठी एक 'आरोग्य कवच' आहे असे गडचिरोली विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉक्टर मिलिंद नरोटे यांनी म्हटले आहे.




# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.




## खा… …आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक ता… …की १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### न…

जि…
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.

### …अमरावती

…जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरुड, इतर

### अकोला

जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ


जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा

जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर

- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



## आकर्षक वेतन

संगणक चालक पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**